सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २० | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## उमर अब्दुल्लांचे विमान दिल्ली ऐवजी राजस्थानला पोहचले

### दिल्लीत लँडिंग स्पेस नसल्यामुळे झाला मनस्ताप

नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांना विमान कंपनीच्या गैरव्यवस्थापनाचा चांगलाच फटका बसला. अब्दुल्ला जम्मूहून दिल्लीसाठी निघाले होते. परंतु, दिल्लीत विमानांची गर्दी असल्यामुळे त्यांचे विमान राजस्थानच्या जयपूर येथे लँड करावे लागले. त्यामुळे संतप्त झालेल्या अब्दुल्लांनी रात्री १ वाजता ट्विट करत संताप व्यक्त केला आहे.

जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला शनिवारी रात्री इंडिगोच्या विमानाने दिल्लीला दिल्लीला निघाले होते. परंतु दिल्ली विमानतळावर विमानांची गर्दी असल्याने विमान उतरण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे विमान दिल्लीत उतरू शकले नाही आणि विमान थेट जयपूरला वळवण्यात आले. तिथे रात्री उशिरा १ वाजता विमान पोहचले.

विमानातून उतरल्यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचा पारा चढला. त्यांनी एक सेल्फी शेअर करत सोशल मीडियावरून संतप्त भावना व्यक्त केल्या. दिल्ली विमानतळ म्हणजे एक संपूर्ण गोंधळाची परिस्थिती आहे. जम्मूहून निघाल्यानंतर ३ तास हवेत फिरवून आम्हाला जयपूरला वळवलें. आता मी विमानाच्या जिन्यावर उभा राहून थोडी ताजी हवा घेत आहे. इथून कधी निघणार, काहीच कल्पना नाही. असे अब्दुल्ला यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, शनिवारी श्रीनगर विमानतळावर खराब हवामानामुळे ६ विमाने रद्द करण्यात आली होती. यामुळे जम्मू विमानतळावरही अनेक प्रवासी अडकले होते. तिथे विमानांच्या उड्डानांना विलंब व रद्द होण्याच्या प्रकारांमुळे पूर्ण गोंधळाचे वातावरण होते. त्यामुळे शेकडो प्रवासी अडकल्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली होती.

## 'एक्सरसाईझ डेझर्ट फ्लॅग-१०' बहुराष्ट्रीय युद्धसरावात भारतीय हवाई दल झाले सहभागी

नवी दिल्ली, २० एप्रिल - 'एक्सरसाईझ डेझर्ट फ्लॅग-१०' या महत्त्वाच्या बहुराष्ट्रीय युद्धसरावात सहभागी होण्यासाठी, भारतीय हवाई दलाची एक तुकडी संयुक्त अरब अमिरातमधील अल धाफ्रा एअर बेस येथे दाखल झाली. या सरावामध्ये भारतीय वायुदलाची मिग-२९ आणि जॅग्वार ही लढाऊ विमाने सहभागी होत आहेत.




एक्सरसाईझ डेझर्ट फ्लॅग हा संयुक्त अरब अमिरातींच्या हवाई दलाने आयोजित केलेला एक बहुराष्ट्रीय सराव असून यामध्ये भारतासह ऑस्ट्रेलिया, बहरीन, फ्रान्स, जर्मनी, कतार, सौदी अरेबिया, कोरियन प्रजासत्ताक, तुर्की, यूएई, युनायटेड किंगडम आणि अमेरिका या देशांची हवाई दले सहभागी होत आहेत. हा सराव २१ एप्रिल ते ८ मे दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

या सरावाचा उद्देश म्हणजे जगातील काही सर्वात सक्षम वायुदलांसह परिचालन ज्ञान आणि सर्वोत्तम प्रणालींची परस्परांमध्ये देवाणघेवाण करणे, तसेच गुंतागुंतीच्या आणि विविध प्रकारच्या लढाऊ मोहिमा एकत्रितपणे पार पाडणे. अशा प्रकारच्या सरावांमुळे सहभाग घेतलेल्या देशांमध्ये परस्पर सामंजस्य, आंतरपरिचालन क्षमता वाढते आणि सैन्य सहकार्य अधिक मजबूत होते.

भारतीय वायुदलाचा सहभाग हा भारताच्या या क्षेत्रातील तसेच जागतिक पातळीवरील मित्र देशांबरोबरच्या संरक्षण संबंधांना आणि आंतर-संचालन क्षमतेस बळकटी देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

## पंतप्रधान मोदी २२-२३ एप्रिलला सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील आठवड्यात सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचे काऊन प्रिन्स आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान यांच्या निमंत्रणावरून २२-२३ एप्रिल रोजी सौदी अरेबियाला भेट देणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा तिसऱ्या काळातील देशातील पहिला दौरा असेल. यापूर्वी पंतप्रधान मोदी २०१६ आणि २०१९ मध्ये सौदीच्या अधिकृत दौऱ्यावर गेले होते. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०२३ मध्ये क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्या नवी दिल्लीच्या राजकीय भेटीनंतर पीएम मोदी सौदीच्या दौऱ्यावर जाणार आहे.

क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये ऋ२० शिखर परिषदेला उपस्थिती लावली होती. यावेळी त्यांनी भारत-सौदी अरेबिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप कौन्सिलच्या पहिल्या बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषवले होते.

परराष्ट्र मंत्रालयाने एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, धोरणात्मक भागीदार म्हणून, दोन्ही देश राजकीय, संरक्षण, सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, संस्कृती आणि लोकांमधील संबंध यासह विविध क्षेत्रात मजबूत द्विपक्षीय संबंध सामायिक करतात. गेल्या अनेक वर्षांपासून भारत आणि सौदी अरेबियाचे संबंध ऐतिहासिक आहे.

दोन्ही देशात २०२० मध्ये भारत-सौदी अरेबियामधील व्यावसायिक संबंध भागीदारीच्या पातळीवर पोहोचले होते. सौदी अरेबीयामध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय कामगार काम करत आहे. तसेच सौदी हा भारताचा पाचवा सर्वात मोठा व्यापारी देश आहे.

## प्रसिद्ध डॉक्टरच्या आत्महत्येप्रकरणी महिलेला पोलीस कोठडी

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांनी राहत्या घरी १८ एप्रिल रोजी आत्महत्या केली. डोक्यात गोळी घालून घेत त्यांनी आयुष्य संपवलं. या प्रकरणात सदर बाजार पोलिसांनी वळसंगकर रुग्णालयात काम करणाऱ्या मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेला अटक केली होती. या महिलेला सोलापूर सत्र आणि दिवाणी न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली. न्यायदंडाधिकारी दीपक कंखरे यांनी हा निर्णय दिला.

कामावरुन काढून टाकल्यानंतर मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेने डॉ. शिरीष वळसंगकर यांना पत्र पाठवले होते. या पत्रात कामावर परत घेतले नाही तर आत्महत्या करेन, अशी धमकी दिली होती. हे





पत्र मिळाल्यानंतर डॉ. शिरीष वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी घरी येऊन रात्री साडेआठ वाजता स्वतःचे परवाना असलेले शस्त्र हाती घेतले आणि डोक्यात गोळी घालून घेत आत्महत्या केली. आत्महत्या करण्याआधी डॉक्टरांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. या चिठ्ठीत मनीषामुळे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख होता. ही चिठ्ठी बिघतल्यानंतर पोलिसांनी चौकशी केली आणि मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेला अटक केली. यानंतर महिलेविरोधात पोलिसांनी पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

नेमके काय घडले ?

प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर १८ एप्रिल रोजी रात्री घरी आले. ते हात धुण्याच्या निमित्ताने बेडरूमच्या बाथरूममध्ये गेले. तिथेच त्यांनी डोक्यात गोळी घालून घेत आत्महत्या केली. गोळीबाराचा आवाज ऐकून घरातील सर्वांनी डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या बेडरूमच्या दिशेने धाव घेतली. बाथरूमच्या जमिनीवर डॉक्टर रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून घरातल्या सर्वांनाच धक्का बसला. डॉक्टरांना तातडीने वळसंगकर रुग्णालयात नेण्यात आले.

तिथे डॉक्टरांनी तपासणी केली आणि न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी हॉस्पिटलमध्ये आले. यानंतर लगेच तपासाला सुरुवात झाली.

डॉ. अश्विन वळसंगकर यांनी केली तक्रार

डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर यांनी प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेबाबत संशय व्यक्त केला. यानंतर पोलिसांनी तपास केला आणि तातडीने कारवाई केली.

## मुंबईचा आंतरराष्ट्रीय विमानतळ बंद राहणार

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मे महिन्यातील ९ तारखेला छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ६ तासांसाठी बंद राहणार आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने याबाबत माहिती प्रसिद्ध केली आहे. धावपट्टीच्या तसेच इतर देखभालीच्या कामामुळे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील विमान वाहतूक ९ मे २०२५ रोजी सहा तासांसाठी बंद ठेवले जाणार आहे. पावसाळ्याआधी हे काम पूर्ण केले जाणार आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने याबाबत शनिवारी माहिती दिली.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने म्हटले आहे की, ०९/२७ आणि १४/३२ या दोन्ही धावपट्ट्यांवर पावसाळ्याआधी देखभालीचे काम हाती घेतले जाणार आहे. हे काम ९ मे रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पूर्ण केले जाईल.

## जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी, जनजीवन विस्कळीत

काश्मीर, २० एप्रिल - जम्मू-काश्मीरमध्ये काही दिवसांपासून पाऊस कोसळत आहे. या मुसळधार पावसाचा फटका अनेक नागरिकांना बसत आहे. दरम्यान आज, रविवारी ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्यामुळे जनजीवन अधिकच विस्कळीत झाले आहे. या मुसळधार पावसामुळे जम्मू-काश्मीरच्या रामबनमध्ये पूरस्थिती निर्माण झाली. या लोंढ्यात तिघांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे तर अनेक जण जखमी झाले आहेत. सुमारे ४० घरांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.



अचानक आलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाच्या परिस्थितीमुळे रामबन जिल्ह्यात परिस्थिती बिकट झाली आहे. दोन हॉटेल्स, काही दुकाने आणि काही घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले आहेत. तसेच रामबन जिल्ह्यातील चिनाब नदीजवळील धर्मकुंड गावात भूस्खलन झाले असून, १० घरे पूर्णपणे खराब झाली असून, सुमारे ४० घरांचे नुकसान झाले आहे. तर ढगफुटीनंतर बचाव पथकाकडून बचावकार्य सुरू असून, शेकडो नागरिकांना वाचवण्यात यश आले आहे. आतापर्यंत ५०० जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या मते, जम्मू आणि काश्मीरमध्ये पुढील दोन ते तीन दिवस पाऊस सुरु राहण्याची शक्यता आहे. विशेषतः डोंगराळ आणि उंच भागात गडगडाटी वादळासह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रामबन, उधमपूर, पुंछ आणि बारामुल्ला जिल्ह्यात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच येथील लोकांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दरम्यान मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे की, जम्मू-काश्मीरमधील रामबनमध्ये झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या घटनेने मला खूप दुःख झाले आहे. या कठीण काळात माझ्या संवेदना पीडित कुटुंबांसोबत आहेत. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहे, जेणेकरून मदत आणि बचाव कार्य त्वरित पार पाडता येईल.

## मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वीतेसाठी शासन कटीबद्ध - मुख्यमंत्री फडणवीस



मुंबई, २० एप्रिल - नागरिकांचे आरोग्य प्राधान्यक्रमावर ठेवून नागरिकांच्या आरोग्य विषयक अनेकविध योजना शासनामार्फत सुरू करण्यात आल्या आहेत. वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. शासनाचे हे मिशन पूर्णत्वास नेण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने सर्वतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे. शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (थउङ) ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत. तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी देखील ही संस्था सहकार्य करणार आहे.

ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवून त्यांच्यावर मोफत उपचार करतील. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनाला असलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्था देखील या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## राष्ट्ररक्षा

ब्रिगेडियर हेमंत महाजन

९०९६७०१२५३

# अमेरिका-चीन आर्थिक युद्ध : भारताकरिता एक संधी



अमेरिकेने जगाच्या विरुद्ध व्यापार युद्ध/ आयात युद्ध/ टॅरिफ युद्ध सुरू केले आहे. याचे वेगवेगळ्याप्रकारे विश्लेषण केले जात आहे. सध्या या व्यापार युद्धाचा निशाणा चीन आहे. या लेखामध्ये टॅरिफ युद्धाचा चीन वरती काय परिणाम होईल, याचे आपण विश्लेषण करू. चीन भारताचा नंबर एक शत्रू आहे आणि येणाऱ्या काळामध्ये तो भारताला वेगवेगळ्या पद्धतीने त्रास देऊन भारताची आर्थिक प्रगती कमी करण्याचा प्रयत्न करेल. अमेरिका-चीन आर्थिक युद्धात जर चिनी अर्थव्यवस्थेची हानी झाली, त्यांचा आर्थिक प्रगतीचा दर कमी होईल व येणाऱ्या काळामध्ये भारताला चिनी आव्हानाचा सामना करणे जास्त सोपे जाईल, कारण चीनची आर्थिक शक्ती वाढते, तेवढेच ते लष्करी ताकद वाढवतात आणि शेजारी राष्ट्रांना (यात भारतपण सामील) त्रास देतात.

निर्यात किंमत स्वस्त ठेवण्यासाठी साम- दंड- भेदचा वापर

चीनने आपली निर्यात किंमत स्वस्त ठेवण्यासाठी कृत्रिम रीत्या आपले चलन मूल्य कमी ठेवले आहे. यामुळे इतर देश चिनी मालाशी स्पर्धा करू शकत नाहीत.

- आयात शुल्क टाळण्यासाठी प्रत्यक्ष केलेल्या आयातीपेक्षा कमी आयात केली आहे असे दाखवणे (Under Invoicing Of Imports)
- कर टाळण्यासाठी नफा लपवून अकाऊंटिंग फ्रॉड करणे
- भारतीय कर टाळण्याकरिता बांगला देश, नेपाळमधून तस्करी करून कर न देता भारतात प्रवेश करणे
- चीनची ओळख लपविण्यासाठी दक्षिण आशियाई देशांमधून चिनी उत्पादने पाठविणे
- स्थानिक उद्योग बंद पाडण्यासाठी स्वस्त वस्तू डंप करणे
- मानसिक युद्धाचा वापर करून चिनी आयातीशिवाय टिकू शकत नाहीत असा भास भारतीय कॉर्पोरेट जगाच्या मनात करणे
- स्वस्त आयातीमुळे भारतीय आयातदारांना चिनी माल खरीदण्यात भाग पाडणे
- भारतीय उदारमतवादी कायद्याला आव्हान देण्यासाठी भारतीय स्वयंसेवी संस्थांचा वापर करणे, वेदांतसारख्या तांबे उत्पादन करणाऱ्या तथाकथित प्रदूषणकारी उद्योगांना थांबवणे आणि त्यांची जागा चिनी आयातीने घेणे
- चिनी प्रभावाखालील असलेल्या भारतीय माध्यमांनी चीनची प्रशंसा करणे, भारताला चीनसोबत सहकार्य करण्याचा सल्ला देणे

### मागील वर्षाच्या तुलनेत ५.८ टक्के तफावत वाढ

डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केलेल्या व्यापार युद्धाचे एक कारण होते, चीन आणि अमेरिकेमधील व्यापाराची तफावत फारच जास्त आहे. कारण चीनला फक्त अमेरिकेची आणि जगाची व्यापार पेठ पाहिजे. जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमधील टॅरिफ युद्ध असूनही अमेरिका आणि चीनमधील व्यापार लक्षणीय आहे. २०२४ मध्ये, चीनसोबत अमेरिकेचा एकूण व्यापार ५८२.४ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला. चीनला होणारी निर्यात १४३.५ अब्ज डॉलर्सपर्यंत घसरली, तर आयात ४३८.९ अब्जपर्यंत डॉलर्सपर्यंत वाढली. परिणामी, चीनसोबत अमेरिकेच्या व्यापारातील तूट २९५.४ अब्जपर्यंत वाढली. मात्र, आता चीनवरील टॅरिफचा परिणाम भयानक आहे. चिनी वस्तूंवरील यूएस टॅरिफ आता १४५ टक्के आहे, ज्यामुळे कंपन्यांना शिपमेंट थांबवावी लागेल किंवा पुरवठा साखळी बदलावी लागेल. फूटवेअर निर्माता हायलाईन युनायटेडने ६०,००० टॅरिफ देण्याऐवजी चीनला शूजचा एक कंटेनर परत केला - जो सामान्य किमतीपेक्षा दहापट जास्त आहे.

### जिनपिंग- दबावापुढे झुकत नाही

अमेरिका आणि चीनमधील टेरिफ वॉर तीव्र होत आहे. अमेरिकेने १४५ टक्के कर लादल्यानंतर, चीनने १२५ टक्के कर लादला आहे. अमेरिकेने लादलेल्या कोणत्याही अतिरिक्त शुल्काला आता ते प्रतिसाद देणार नाही. अमेरिकेने लादलेले असामान्य शुल्क आंतरराष्ट्रीय आणि आर्थिक व्यापार नियमांचे गंभीर उल्लंघन करते, असे चीनने म्हटले आहे. मात्र वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन ही चीनने विकत घेतलेली युनायटेड नेशन्सची संस्था आहे, जी चिनी प्रभावाखालती आहे आणि जगाचे नुकसान करत आहे.

चीनवर १४५ टक्के कर लादण्याचा अर्थ असा आहे की, चीनमध्ये बनवलेले १०० डॉलर्सचे उत्पादन आता अमेरिकेत पोहोचल्यावर २४५ डॉलर्सचे होईल. अमेरिका चीनकडून ४४० अब्ज डॉलर्सची आयात करते. अमेरिकेत चिनी वस्तू महाग झाल्यामुळे त्यांची विक्री कमी होईल. मात्र, आता चीन वगळता सर्व देशांवर ९० दिवसांसाठी अमेरिकेकडून १० टक्के बेसलाईन टेरिफ लादण्यात आला आहे. चीनमधून उत्पादने आयात करणाऱ्या अमेरिकन कंपन्यांसाठी पर्याय शोधणे एक मोठे आव्हान आहे. ही भारताकरता संधी आहे.

फँटानिल अमेरिकेला आतून पोकळ करत आहे

चीनने अमेरिकेविरुद्ध चालवलेले ड्रग/नार्को टेरोरिझम सुद्धा व्यापार युद्धाचे एक कारण आहे. फँटानिल ड्रग हेरॉइनपेक्षा ५० पट जास्त आणि मॉर्फिनपेक्षा १०० पट जास्त शक्तिशाली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणतात की, हे ड्रग चीनमध्ये तयार केले जाते आणि तेथून ते मेक्सिको आणि कॅनडामार्गे अमेरिकेत पाठवले जाते. २०२४ मध्ये फँटानिलच्या अतिसेवनामुळे ७०,००० हून अधिक अमेरिकन लोकांचा मृत्यू झाला होता. हे ड्रग अमेरिकेला आतून 'पोकळ' करीत आहे. हे चीनचे कारस्थान आहे.

### व्यापार युद्धाची वेळ चीनकरिता अत्यंत गैरसोयीची

व्यापार युद्धाची ही वेळ चीनकरिता अत्यंत गैरसोयीची आहे. कारण सध्या चीनची अर्थव्यवस्था ५ टक्के सुद्धा वाढत नाही. त्यांची खरी वाढ ही अडीच ते तीन टक्के इतकी कमी असावी. चीनमध्ये सरकारचे कर्ज खूप वाढलेले आहे. बाहेरचे जग चिनी वस्तू आयात कर वाढल्यामुळे घ्यायला तयार नाही.

मात्र, चीनने जागतिक बाजारपेठांमध्ये आणि जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रचंड घुसखोरी केलेली आहे आणि एक चक्रव्यूव्हासारखी परिस्थिती निर्माण केली आहे. म्हणजेच चीनने वेगवेगळ्या देशात जिथे कच्च्या मालाचा पुरवठा स्वस्तात होऊ शकतो अशा जागा किंवा खाणींवर ताबा मिळवलेला आहे. जगाची ५० ते ५५ टक्के मॅन्युफॅक्चरिंग म्हणजे वस्तू निर्माण करणे हे चीनमध्ये होत आहे. चीनने आपली मॅन्युफॅक्चरिंग क्षमता एवढी वाढवलेली आहे की, कुठलाही देश त्यांच्याशी मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रामध्ये शर्यत करू शकत नाही. कारण एवढ्या कमी किमतीमध्ये माल उत्पादित करणे कुठल्याही देशाला अशक्य आहे.

मात्र आता चीनमध्ये मंदी निर्माण होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. चीनचे रियल इस्टेट सेक्टर हे मंदीकडे गेलेले आहे. चीनमधील ६० ते ६५ टक्के घरे ही मॉडगेज या पद्धतीमध्ये गेलेली आहेत. यामुळे घराच्या किमती गेल्या २० महिन्यांपासून कमी कमी होत आहेत आणि बहुतेक कुटुंबांनी घरांमध्ये केलेली गुंतवणूक आता प्रचंड प्रमाणामध्ये कमी झालेली आहे आणि त्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. यामुळे सामान्य चिनी माणसाची खर्च करून चिनी अर्थव्यवस्थेला मदत करण्याची क्षमता अत्यंत कमी झालेली आहे. कॉर्पोरेट वर्ल्ड किंवा व्यापार क्षेत्रामध्ये कर्जबाजारी ही १२३ ते १७२ टक्के झालेली आहे. चिनी अर्थव्यवस्था आता त्यांनी घेतलेल्या कर्जाच्या सापळ्यामध्ये पसरलेली आहे. या कर्ज सापळ्यातून बाहेर पडणे ना नागरिकांना शक्य आहे ना तिथे असलेल्या व्यापार जगताला.

दरम्यान, चीनमध्ये वर्षानुवर्षे औद्योगिक गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणात जास्त क्षमता (जींशी उररिर्ळीू निर्माण झाली आहे, विशेषतः इलेक्ट्रिक वाहने, सौर पॅनेल, स्टील आणि सेमीकंडक्टर यासारख्या क्षेत्रात. आता उत्पादन केवळ देशांतर्गत गरजांपेक्षा जास्त नाही तर जागतिक मागणीपेक्षा जास्त आहे. कारखाने चालू आहेत. कारण ते बंद केल्याने टाळेबंदी आणि सामाजिक समस्या निर्माण होतील.

### युद्धामुळे चीनचे प्रचंड नुकसान होणार


चीनकडे सुमारे ६०० अब्ज पौंड (सुमारे ७६० अब्ज डॉलर्स) अमेरिकन सरकारी रोखे आहेत. याचा अर्थ असा की, चीनकडे अमेरिकन अर्थव्यवस्थेवर प्रभाव पाडण्याची मोठी शक्ती आहे. चीन-अमेरिका व्यापार युद्ध दीर्घकाळ चालण्याची शक्यता आहे. या युद्धामध्ये कोण जिंकेल हे सांगणे सोपे नाही. चीनची आर्थिक क्षमता प्रचंड आहे. मात्र, एवढे नक्की की, अमेरिकेशी सुरू केलेल्या युद्धामुळे चीनचे प्रचंड नुकसान होणार आहे आणि ही भारताकरता मोठी संधी आहे. चीन निर्यात करीत असलेल्या वस्तू आपण जर चीनपेक्षा कमी किमतीत अमेरिकेला आणि जगाला पुरवू शकत असू तर आपण जगामध्ये एक मनुफॅक्चरिंग देश म्हणून महत्त्वाची भूमिका बजावू शकतो आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा वाढण्याचा वेग हा वाढू शकतो. यामुळे येणाऱ्या काळामध्ये आपण आर्थिकदृष्ट्या चीनची बरोबरी करू शकतो किंवा त्यांच्या पुढे देखील जाऊ शकतो. या संधीचा आपण पुरेपूर वापर करायला पाहिजे.

## मंथन

डॉ. विवेक राजे


९८८१२४२२२४

# आत्मप्रताडना




**या देशातील हिंदू समाजाच्या दृष्टीने हे स्वागतार्ह बदल आहेतच. परंतु या बदलांमुळे गरीब मुस्लिमांना देखील याचा फायदा होणार आहे. वक्फ कायदा आता अधिक लोकाभिमुख झालेला आहे. तेव्हा हिंदूंनी आत्मप्रताडना न करता खुल्या दिलाने मोदी सरकारचे अभिनंदन करायला हवे.**

आजपर्यंत जगाला ज्ञात असलेल्या इतिहासातील सर्वोत्तम नेता कोण? असा प्रश्न विचारला तर कोणताही जाणता हिंदू, भगवान श्रीकृष्ण असेच उत्तर देईल. पण या सर्वोत्तम नेत्याच्या प्रत्यक्षातील उपलब्धींचा विचार केला तर त्यालाही शंभर टक्के यश मिळाले असे म्हणता येत नाही. त्याच्या समोर द्रौपदीची पाचही मुले मृत्यूमुखी पडली, सख्खा भाचा अभिमन्यू चक्रव्यूहात मारला गेला, वासवि शक्ती परत इंद्राकडे जावी म्हणून त्याला घटोत्कचाचा बळी द्यावा लागला, आपल्या कुळाचा होणारा निर्वंश त्याला थांबविता आला नाही. पण तरीही प्राप्त परिस्थितीत धर्म रक्षणार्थ जे जे करणे शक्य होते, ते ते भगवान श्रीकृष्णाने निर्धाराने केले. या केलेल्या कृत्यांच्या अपरिहार्य परिणामांना देखील तो शांतपणे सामोरा गेला. वरून आपल्या पुढील पिढ्यांनी क्रियाशील व्हावे, कर्मप्रवण व्हावे म्हणून हिंदू समाजाला भगवद्गीतेच्या माध्यमातून जगण्याच्या तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन करून गेला.



राष्ट्रकार्य किंवा धर्मकार्यात शंभर टक्के यश एकाच फटक्यात कधीही मिळत नसते हे आज स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवून घेणारे अनेकदा विसरून जातात. धर्म संस्थापनेला शतकांचा कालावधी लागत असतो. तसेच समाजातील अयोग्य प्रथा-परंपरा दूर करण्यासाठी देखील अनेक दशकांचा काळ लागत असतो. भारतासारख्या लोकशाही देशात तर बदल घडवून आणणे महा जिकरीचे काम असते. कारण या देशात बहुसंख्य लोक हिंदूधर्मीय आहेत आणि हिंदू धर्मनिच मुळात उपासनेचे, उपासना पद्धती निवडण्याचे, वेगवेगळे विचार-आचार पद्धती नुसार जीवन जगण्याचे, प्रथा, परंपरा निवडण्याचे प्रचंड स्वातंत्र्य दिलेले आहे. 'एकम् सत् विप्रा बहुधा वदन्ति' हे तत्त्व प्रत्यक्षात आचरणात आणणारा आजच्या घडीला फक्त हिंदू धर्म आणि हिंदू समाजच आहे. त्यामुळे सैलसर अशी एक जीवनाची वीण हिंदू धर्म आणि समाजातच आढळते. परिणामी नेतृत्वाने केलेल्या कोणत्याही कृतीचे विश्लेषण इथे अनेक अंगाने केले जाते. त्यात भर म्हणजे देश स्वतंत्र झाल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी निर्माण केलेली व्यवस्था आणि अत्यंत लोचट असलेले काही नेते. त्यामुळे तथाकथित लोकशाहीवादी असलेल्या काँग्रेस पक्षातील एकाही नेत्याने, संपूर्ण विरोधी पक्ष तुरुंगात असताना म्हणजे उपस्थित नसताना 'सेक्युलर' हा शब्द संविधानात घालण्याच्या इंदिरा गांधी यांच्या कृतीचा तेव्हा विरोध केला नाही आणि त्यानंतर कधी निषेधही केला नाही. तसेच सेक्युलर वा धर्मनिरपेक्षता या शब्दाचा अर्थ सर्व धर्मांविषयी तटस्थता हा न घेता अल्पसंख्यक म्हणून विशेष दर्जा देत अब्राह्मीक धर्मांना काँग्रेसच्या सत्ताकाळात खुली सूट देण्यात आली. मतपेढीचे राजकारण करीत मग अल्पसंख्यक मंत्रालय, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड, वक्फ बोर्ड, अल्पसंख्यक शैक्षणिक संस्थांसाठी विशेष तरतुदी असे एक हिंदू समाजविघातक जाळे विणले गेले. त्यात सत्तेचा समतोल साधण्याच्या नादात लोकशाहीच्या प्रशासन, शासन व न्यायपालिका यांचे एक दुर्घट जाळे निर्माण केले गेले. आपल्या पायाखालची जमीन निसटते आहे याची सर्वांत प्रथम जाणीव सत्ताधारी पक्षाला होत असते. त्या जाणिवेतून मग २०१३ मध्ये मनमोहनसिंग पंतप्रधान असताना वक्फ कायद्यात हिंदू समाज विघातक अशी तरतुदी करण्यात आल्या. जसे, वक्फ (ट्रॅब्यूनल) न्यायाधिकरणाच्या निर्णयांना वरिष्ठ न्यायालयात आव्हान देता येत नव्हते. वक्फ सर्वेक्षणाने वक्फची जमीन म्हणून घोषित केलेल्या जमिनीच्या मालकीहक्काचे कज्जे वक्फ न्यायाधिकरणातच चालवावे लागत होते. वक्फने एखादी जमीन आपल्या मालकीची आहे असे जाहीर केले की, ती वक्फची जमीन नसून आपल्या मालकीची आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी मूळ जमीन मालकावर टाकण्यात आली होती. त्यातही ही सर्व कागदपत्रे अशा व्यक्तीला वक्फ न्यायाधिकरणासमोरच मांडावी लागत होती. वक्फ बोर्डावर बोहरा, शिया, अहमदिया आणि स्त्रियांना प्रतिनिधित्व देण्यात आले नव्हते. वक्फ जाहीर करण्यासाठी काळाची मर्यादा (लॉ ऑफ लिमिटेशन) काढून टाकण्यात आले होते. या सगळ्या २०१३ च्या मनमोहनसिंग सरकारच्या काळात केलेल्या तरतुदी २०२५ च्या वक्फ विधेयकाने एका फटक्यात काढून टाकण्यात आल्या आहेत.

आता वक्फ जमीन मालकीहक्काच्या संदर्भात जिल्हाधिकारी पहिला अहवाल तयार करून विवादाचा निर्णय देणार आहे. वक्फ न्यायाधिकरणाच्या निर्णयांना आता उच्च न्यायालयात आव्हान देण्याचा मार्ग खुला झाला आहे. वक्फ न्यायाधिकरणाच्या अध्यक्षपदी जिल्हा न्यायाधीश असतील. वक्फने एखाद्या संपत्तीवर आपला मालकीहक्क सांगितला तर तो मालकीहक्क सिद्ध करण्याची जबाबदारी वक्फ बोर्डाची असणार आहे, याचा अर्थ कागदोपत्री पुरावा सादर करावा लागेल. तसेच वक्फने आपला हक्क सांगितला तरी ती जमीन ज्याच्या ताब्यात असेल त्याच्याच ताब्यात रहाणार आहे. वक्फ बोर्डाची संरचना अधिक लोकशाही प्रवण झालेली आहे. अनेक वंचित मुस्लिम समुदायांना जसे की बोहरा, अहमदिया यांना वक्फ बोर्डाच्या संरचनेत आता स्थान मिळणार आहे. मागील दहा वर्षांच्या कालावधीत वक्फच्या नावाखाली मुस्लिम समाज ज्या वेगाने भल्या-बुऱ्या मार्गाने जमिनी ताब्यात घेत होता त्याला एकदमच ब्रेक लागला आहे. वक्फची मनमानी संपुष्टात आली आहे. वास्तविक काँग्रेसी शासन काळात विविध कायद्यांच्या आधारे हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती गिळंकृत करण्यासाठी चौखुर उधळलेल्या अब्राहमिक धर्मांध घोड्याला मागील अकरा वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या सरकारने लगाम घातला आहे. मागील अकरा वर्षांत काश्मीर संबंधीचे कलम ३७०, तिहेरी तलाक, सीएए, एनआरसी, अयोध्येतील श्रीराम मंदिर, पाकिस्तान पाळत असलेल्या मुस्लिम अतिरेक्यांच्या ठिकाणांवर सर्जिकल स्ट्राईक, नक्षलवादाचा बिमोड हे सगळे कार्य डोळे दीपवणारे आहे. आता या देशात बॉम्बस्फोट होत नाहीत. त्याच वेळी हा देश आर्थिक क्षेत्रात देखील उत्तम कामगिरी करताना दिसतो आहे. मूलभूत सुविधा जसे रस्ते, विमानतळ, रेल्वे, बंदरे विकसित होताना दिसतात. हे सगळे माहिती असूनही अनेक सुबुद्ध हिंदू अकारण आपणच प्राप्त केलेल्या यशाला कमी लेखताना दिसतात. यालाच 'आत्मप्रताडना' म्हणतात. ही वृत्ती हिंदू समाजात प्रयत्नपूर्वक भिनवली गेली आहे. यासाठी अत्यंत सुनियोजित पद्धतीने प्रयत्न केले गेले. दुर्दैवाने यात आमच्याच विचारवंतांचा, अभ्यासकांचा मोठा वाटा आहे. जे जे म्हणून या मातीतून तयार झाले ते ते सर्व हीन दर्जाचे असे मागील दीडदोनशे वर्षे सातत्याने आम्हाला सांगितले गेले. हिंदू प्रथा-परंपरा कशा चुकीच्या आहेत हेच सातत्याने सांगण्यात आले. बरीच वर्षे अनेक हिंदू विचारवंतांना प्रत्यक्षात कलम ३७० कसे हटवणार हा प्रश्न पडत होता. पण आज ३७० कलम हा इतिहास झाला आहे आणि त्यावर सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय कायदेशीर असल्याची मोहोर उमटवली आहे. राममंदिर देखील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उभारण्यात आले आहे. हिंदू विरोधी लोक अनेक वल्गना करीत होते आणि करीत असतात. त्यातूनच मग संसदेने दोन्ही सभागृहात बहुमताने पारित केलेल्या सुधारणांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याच्या बाता मारल्या जातात. शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर काँग्रेसच्या राजीव गांधी सरकारने आपल्या पाशवी बहुमताच्या जोरावर विधेयक पारित करून सर्वोच्च न्यायालयाला, आधीचा पोटगी देण्याचा निर्णय बदलण्यास भाग पाडले होते हा इतिहास आहे. अल्पसंख्यकांच्या हिताच्या नावाखाली बहुसंख्य लोकांवर अन्याय करता येत नसतो. अल्पसंख्यकांना संरक्षण देणे याचा अर्थ त्यांना आक्रमक होण्याची सूट देणे असा होत नाही. परंतु २०१३ मध्ये जेव्हा आपण पुन्हा सत्तेत येऊ शकत नाही याची काँग्रेसला जाणीव झाली तेव्हा वक्फ कायद्यात मुस्लिम अनुनय करणाऱ्या, त्याद्वारे इस्लामधर्मीयांना लोकशाही विरोधी अधिकार देणाऱ्या तरतुदी वक्फ कायद्यात केल्या गेल्या. लोकशाहीत एखादा विवाद उच्च वा सर्वोच्च न्यायालयात नेता येणार नाही असे म्हणणे म्हणजे नैतिकता पायदळी तुडवणे होय. २०१३ च्या वक्फ कायद्यात अशा सगळ्या लोकशाहीविरोधी तरतुदींचा समावेश करण्यात आला होता. या सर्वच तरतुदी नवीन कायद्याने रद्द करण्यात आल्या आहेत.

या देशातील हिंदू समाजाच्या दृष्टीने हे स्वागतार्ह बदल आहेतच. परंतु या बदलांमुळे गरीब मुस्लिमांना देखील याचा फायदा होणार आहे. वक्फ कायदा आता अधिक लोकाभिमुख झालेला आहे. तेव्हा हिंदूंनी आत्मप्रताडना न करता खुल्या दिलाने मोदी सरकारचे अभिनंदन करायला हवे.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

९४२२८०४४३०

# तुर्कस्तानमधील सत्तासंघर्ष

मुस्तफा कमाल एतातुर्क यांनी १९२३ ते १९३८ या आपल्या अध्यक्षीय कालखंडात नव्या आणि आधुनिक तुर्कस्तानचा पाया रचला होता. त्यांना 'आधुनिक तुर्कस्तानचा जन्मदाता' मानले जाते. पण ही स्थिती फारकाळ टिकली नाही. २८ ऑगस्ट २०१४ पासून तर रिसेप तय्यिब एर्दोगान हे तुर्कस्तानच्या अध्यक्षपदी आहेत. हा एक सनातनी, माथेफिरू आणि धटिंगण आज तुर्कस्तानवर राज्य करतो आहे. प्रगत विचारांची जनता धर्मांध आणि जुलमी राजवटीत भरडून निघत आहे. ही राजवट लोकशाही मार्गाने या अवस्थेप्रत पोचली आहे, हे या देशाचे खास दुर्दैव म्हटले पाहिजे.

बराचसा भाग पश्चिम आशियात तर लहानसा भाग पूर्व युरोपमध्ये असलेल्या तुर्कस्तानमध्ये यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अध्यक्ष एर्दोगान (वय वर्ष ७१) यांच्या जस्टिस अँड डेव्हलपमेंट पक्षाला (एकेपी) तेथील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या रिपब्लिकन पीपल्स पक्षाने (सीएचपी) अनपेक्षित आणि जबरदस्त धक्का दिला आहे. मार्माराचा समुद्र आणि काळा समुद्र यांना जोडणाऱ्या बॉसपोरसच्या सामुद्रधुनीच्या दोन्ही तीरांवर वसलेल्या इस्तंबूल शहराचे महापौर इकरेम इमामोग्लू हे धर्मनिरपेक्ष भूमिका घेणाऱ्या रिपब्लिकन पीपल्स पक्षाने नेते आहेत. इमामोग्लू तुर्कस्तानात तरुण वर्गात अतिशय लोकप्रिय आहेत. म्हणून त्यांच्या पक्षाने तुर्कस्तानच्या आगामी म्हणजे २०२८ च्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी इमामोग्लू यांना उमेदवारी दिली आहे. ही निवडणूक लढवण्यास विद्यमान अध्यक्ष एर्दोगान हे मात्र कायद्याने पात्र नाहीत. कारण घटनेनुसार कुणाच्याही वाट्याला अध्यक्षपदाचे फक्त दोनच कार्यकाळ येऊ शकतात. पण घटनाच बदलली तर? किंवा एर्दोगान यांनी मुदत संपण्यापूर्वीच राजीनामा दिल्यामुळे मुदतपूर्व निवडणुका झाल्या तर? अशावेळी एर्दोगान यांचे दोन कालखंड पूर्ण होणार नाहीत. मग मात्र एर्दोगान पुन्हा उभे राहू शकतील. या पळवाटीचा लाभ घ्यावा, अशी खटपट एर्दोगान यांनी सुरू केली आहे. खरेतर जवळपास गेली २२ वर्षे एर्दोगान तुर्कस्तानमध्ये सत्ता उपभोगत आहेत. त्यांच्या कार्यकाळात तुर्कस्तानमध्ये चलनवाढ ३८ टक्क्यांवर गेली आहे. अशावेळी त्यांनी सत्ता दुसऱ्या सक्षम नेत्याच्या हाती सोपवण्यातच शहाणपणा आहे. पण सत्तेचा मोह दूर सारणे भल्याभल्यांना जमलेले नाही. त्यातून एर्दोगान हे तर जन्मजात (कॉनजेनायटल) सत्तापिपासू आहेत.




बराचसा आशिया खंडात आणि थोडासा युरोप खंडात पसरलेला तुर्कस्तान

२०१६ मध्ये तुर्कस्तानमध्ये एक अयशस्वी बंड झाले होते. त्यानंतर तुर्कस्तानच्या घटनेत आमूलाग्र बदल करण्यात आले. पंतप्रधानपदाऐवजी अध्यक्षीय राजवट सुरू करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुकीचे अधिकार अध्यक्षांना देण्यात आले. या घटना दुरुस्तीच्या बाजूने ५१.४१ टक्के तर दुरुस्तीविरुद्ध ४८.५९ टक्के मते पडून घटना दुरुस्तीचा ठराव मंजूर झाला.

घटनादुरुस्तीनंतर एर्दोगान अध्यक्ष म्हणून सत्तेवर आहेत. तुर्कस्तान हा खरे तर युरोपीय लोकशाही विचारसरणीचा प्रभाव असलेला इस्लामी देश आहे, नव्हे होता. पण एर्दोगान यांच्या दीर्घकालीन कार्यखंडात तुर्कस्तानमध्ये लोकशाहीचा संकोच होत गेला. त्यानंतर आक्रमक आणि उग्र राष्ट्रवाद प्रभावी होत जाणे स्वाभाविक होते. याशिवाय तुर्कस्तानमध्ये इस्लामवादाचीही पकड पक्की झाली. त्यानंतर तुर्कस्तानमध्ये निवडणूक यंत्रणेवरही सरकारचा प्रभाव वाढत गेला. आज तुर्कस्तानमध्ये चलनवाढ, बेरोजगारी आणि भूकंप यांनी जनता त्रस्त झाली आहे. पण एर्दोगान इकडे साफ दुर्लक्ष करीत आहेत. नाटोचा सदस्य असून देखील युक्रेन युद्धात तुर्कस्तानने युक्रेनची नाही तर रशियाची बाजू घेतली आहे. यासाठी कारण असे दिले की, तुर्कस्तानमधील कुर्द बंडखोरांना एकेकाळी युक्रेनने आश्रय दिला होता. आज आर्थिक चणचण असून सुद्धा तुर्कस्तान लष्करी सज्जतेवर गरजेपेक्षा जास्त खर्च करतो आहे. यासाठी कोणतेही योग्य कारण तुर्कस्तानला देता आलेले नाही /देता येणारही नाही. जगात आज एका वेगळ्याच प्रकारचे नेते उदयाला आलेले दिसतात. ते लोकशाही पद्धतीनुसार मिळणाऱ्या सर्व अधिकारांचा पुरेपूर फायदा घेतात आणि नेतेपद मिळवितात. पण नेतेपद मिळताच त्यांच्यातील लोकशाही मनोवृत्ती पार लोप पावते. रशियाचे पुतिन, ब्राझीलचे बोल्सेनारो, तुर्कस्तानचे एर्दोगान यांच्या पंक्तीला आता अमेरिकेचे ट्रंप हेही येऊन बसले आहेत की काय अशी शंका निरीक्षक व्यक्त करीत आहेत. या नेत्यांना लोकशाही पद्धतीने मिळालेला विजय मान्य असतो. पण याच पद्धतीने होणारा पराभव स्वीकारण्यास मात्र हे नेते तयार नसतात. एर्दोगान यांचे सध्याचे वर्तन बघितल्यास हा मुद्दा सहज समजू शकेल. एर्दोगान यांना इकरेम इमामोग्लू यांचा हेवा वाटावा, त्यांचे नेतृत्व जनमानसात मान्य होऊ नये, असे वाटले तर ते मनुष्यस्वभावाच्या मर्यादा पाहता गैर ठरवता येणार नाही. पण प्रतिस्पर्ध्याला परास्त करण्यासाठी त्यांनी स्वीकारलेला मार्ग सर्वस्वी त्याज्य आहे. सीएचपीचे किंवा आरपीपीचे (रिपब्लिकन पीपल्स पार्टी) एमरम इमामोग्लू (वय वर्ष ५४) या नावाचे एक नेते तुर्कस्तानमध्ये पर्यायी नेते म्हणून समोर येण्यास प्रारंभ झाला. त्यांनी भरपूर परिश्रम आणि वैध प्रचार करून तुर्कस्तानातील सर्वांत मोठ्या आणि प्रसिद्ध इस्तंबूल शहराचे महापौरपद प्राप्त केले. त्यांच्या नेतृत्वाचे दुसरे वैशिष्ट्य हे आहे की, त्यांच्या नेतृत्वात सीएचपीने तुर्कस्तानमधील ३६ प्रांतातील स्थानिक निवडणुकीतही अभूतपूर्व यश संपादन केले आहे. या निमित्ताने इमामोग्लू यांच्या सीएचपीने एर्दोगान यांच्या जस्टिस अँड डेव्हलपमेंट पक्षाचा (एकेपी) सर्व महत्त्वाच्या मतदारसंघात निर्णायक पराभव केला आहे. राजधानी अंकारा आणि सर्वांत मोठे शहर असलेल्या इस्तंबूलसह एझ्मीर, अंताल्या, बुर्सा या शहरातही सत्तारुढ जस्टिस अँड डेव्हलपमेंट पक्षाचा सपशेल पराभव झाला आहे. २०२८ मधील निवडणुकीसाठी पक्षाने एर्दोगान यांचा उत्तराधिकारी जाहीर केलेला नाही. अध्यक्षपदासाठी पक्षांतर्गत निवडणूक जाहीर झाली आणि लगेचच १९ मार्च रोजी महापालिकेत भ्रष्टाचार आणि दहशतवादास समर्थन दिल्याच्या आरोपांखाली इमामोग्लू यांना अटक करण्यात आली. लाचखोरी, खंडणी आणि गुन्हेगारांची संघटना उभारणे असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले. लगेच त्यांचे महापौरपद रद्द करण्यात आले आणि त्यांना तुरुंगात धाडण्यात आले. त्याच दिवशी पक्षांतर्गत निवडणुकीत इमामोग्लू यांनी दणदणीत विजय मिळवला. ते अध्यक्षीय निवडणूक लढवू शकतात. पण तत्पूर्वी त्यांच्यावरील गुन्हे सिद्ध झाले, तर मात्र त्यांची उमेदवारी बाद ठरेल. अध्यक्षपदाचा उमेदवार उच्चशिक्षित असला पाहिजे असा तुर्कस्तानमध्ये नियम आहे.

म्हणून इमामोग्लू यांची पदवीच रद्द करण्याचा निर्णय घेण्यास विद्यापीठाला बाध्य करण्यात आले आहे. त्यांना वाटेतून बाहेर काढण्यासाठीच हा बनाव रचल्याची जाणीव तुर्की जनतेला आहे. त्यामुळे इस्तंबूलमध्ये विविध विद्यापीठांतील विद्यार्थी निदर्शने करीत आहेत. जनतेच्या पाठिंब्याच्या भरवशावर या अभूतपूर्व निदर्शनांचे लोण संपूर्ण तुर्कस्तानभर पसरले आहेत. काही विदेशी पत्रकारांना देश सोडून जाण्यास सांगण्यात आले आहे. शेकडो निदर्शकांना अटक करण्यात आली आहे. पण तरीही जनतेच्या रेट्यासमोर आपला निभाव लागेल का अशी शंका एर्दोगान यांना येऊ लागली आहे. म्हणूनच दडपशाहीचे निरनिराळे प्रकार ते अमलात आणीत आहेत. या पृष्ठभूमीवर भविष्यात तुर्कस्तानमधील सत्तासंघर्ष अतिशय तीव्र स्वरूप धारण करणार यात शंका नाही.

॥ उसंतवाणी ॥

१४८६

प्यायला मिळेना । घोटभर पाणी ।
पुतळ्याची गाणी । ओठावर ॥१॥

पाण्यासाठी का रे । करता ओरड ।
पुरे झाली रड । नेहमीची ॥२॥

आणिली ही मेट्रो । महामार्ग नवे ।
आणि काय हवे । सांगा आता ॥३॥

जाऊ चंद्रावर । गाठू या मंगळ ।
खरी ती चंगळ । करू चला ॥४॥

पाणी नका मागू । पडेल पाऊस ।
मागवा ना हौस । तेंव्हा तुम्ही ॥५॥

वीज नि कचरा । ती अतिक्रमणे ।
पुरे हे गाऱ्हाणे । नेहमीचे ॥६॥

कांत समस्येला । दाबुनिया खोल ।
विकासाचे बोल । ओठांवरी ॥७॥



श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
२० एप्रिल २०२५



कंकराळा ( ता सोयगाव) येथील संभाजी पाटील यांच्या मोसंबी बागेत झाडे जगविण्याच्या उपाय-योजना सांगताना डॉ पाटील व उपस्थित शेतकरी .

# रक्षामंत्री आणि मुख्यमंत्री यांना नवकार फाऊंडेशन तर्फे मंगल कलश समर्पित

छत्रपती संभाजीनगर: येथे नवकार फाऊंडेशनच्या माध्यमातून सकल जैन समाजाच्या तत्त्वावधानात आणि प.पू. गच्छाधिपती अभयदेवसुरीश्वरजी महाराज यांच्या आशीर्वादाने ९ एप्रिल रोजी विश्व नवकार दिवसानिमित्त भव्य नवकार महामंत्र जपानुष्ठान संपन्न झाले. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) परिवाराच्या,नवकार फाउंडेशन, व सकल जैन समाज च्या आवाहनानुसार जगभरात १०८ देशांमध्ये एकाच वेळी नवकार महामंत्राचा जाप करून विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आला. या ऐतिहासिक आयोजनात छत्रपती संभाजीनगरने सक्रिय सहभाग नोंदवला.



प.पू. स्पष्टवक्ता सिद्धीसुधाजी म.सा. यांच्या सान्निध्यात झालेल्या या अनुष्ठानात २७ विशेष मंगल कलशांवर जपानुष्ठान करण्यात आले. यापैकी एक मंगल कलश भारताचे रक्षामंत्री मा. राजनाथ सिंह आणि दुसरे महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना नवकार फाऊंडेशनच्या वतीने गुरुभक्त गौरव मुगदिया यांच्या हस्ते समर्पित करण्यात आले. या मंगल कलशांचा स्वीकार रक्षामंत्री आणि मुख्यमंत्री यांनी भावपूर्णपणे केला आणि विश्व नवकार दिवसाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नवकार फाऊंडेशन व जितो परिवाराचे आभार मानून अभिनंदन केले.

या प्रसंगी राजस्थानचे राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे, आमदार प्रशांत बंब मेवाड नरेश लक्षराज सिंग,मा.अर्थ मंत्री डॉक्टर भागवत कराड,मंत्री अतुल सावे,राजु शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विश्व नवकार दिवसाच्या घोषणेसाठी आणि सक्रिय सहभागासाठी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही विशेष आभार मानण्यात आले. हा कार्यक्रम भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संभाजीनगरच्या जैन समाजासाठी अत्यंत गौरवास्पद ठरला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्या.साठी सकल जैन समाज चे अध्यक्ष राजेन्द्र दर्डा, जितो अध्यक्ष अनिलकुमार संचेती, नवकार फाऊंडेशन प्रकल्प प्रमुख रवी मुगदिया, अनिलकुमार संचेती, विलास साहूजी, संजय संचेती, विनोद बोकडिया, राजेश मुथा, अजित जैन, रवी लोढा, निलेश जैन, पंकज साकला, हितेश कांकरिया, प्रकाश कोचेटा, अभिजीत हिरप, पियुष कासलीवाल, विकास रायमाणे, अमित काला, संतोष पापडीवाल आणि समीर ठोळे यांनी अथक परिश्रम घेतले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (९६) विद्याभारती

स्वातंत्र्यानंतर शिक्षण क्षेत्रात अपेक्षित कायापालट झाला नाही. लेपींशपीं संस्कृतीनी जोर धरला. सरस्वती शिशु मंदिराची संघाने स्थापना केली होतीच, त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. १९७७ मध्ये विद्याभारतीची स्थापना झाली. या अंतर्गत शिशु वाटिका- शिशु मंदिर- विद्या मंदिर - सरस्वती विद्यालय- उच्चतर शिक्षा संस्थान- शिक्षक प्रशिक्षण केंद्र आदि संस्था आहेत. सा विद्या या विमुक्त ये हे याचे बोधचिन्ह (श्रेसे) आहे. याचे देवपुत्र हे हिंदी मासिक सचित्र- प्रेरक बालमासिक आहे. जे खूपच वाचनीय आहे. याचा संपर्क पत्ता ४० संवाद नगर इंदोर ४५२००१ मध्य प्रदेश. दूरध्वनी (०७३१)) २४००४३९ आहे. आणि विद्याभारतीची ही श्रृंखला जम्मू काश्मीर ते तमिळनाडू आणि केरळ पर्यंत आणि गुजरात तसेच राजस्थान ते मणिपूर आसाम पर्यंत पसरली. अंदमान निकोबार द्वीप समूह मध्ये सुद्धा हे शिशुमंदिर आहे. वनवासी क्षेत्रात विद्याभारतीने विशेष लक्ष घातले. विद्याभारतीच्या सर्वच शाखांमध्ये योग आणि संगीताला अनिवार्य स्थान आहे.

अखिल भारतीय खेल कुद हे विद्याभारतीचे एक प्रभावशाली वार्षिक आयोजन आहे. स्वस्थ शरीर स्वस्थ मन हा त्यांचा उद्देश आहे. यांच्या मार्गदर्शक पुस्तिका आणि गीतांच्या कॅसेट सर्वांनाच खूप आवडतात. पुत्र का प्रथम गुरु मातापिता आहेत. त्यामुळे माता-पिता शिक्षा कार्यक्रम विद्याभारतीचे प्रमुख कार्य आहे. या उपक्रमाचे नाव घर प्रथम पाठशाला आहे. या माध्यमातून ग्रामीण- वनवासी सेवावस्तीत आणि शहरात सुद्धा हिंदुत्वाचे वातावरण सफलतापूर्वक निर्माण होते. विद्याभारतीची विशेषता म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांची मूल्यांकन केलेली उत्तर पत्रिका परत पाहण्यासाठी देतात, म्हणजे विद्यार्थी आपले पुनर्मूल्यांकन स्वतः करू शकतो. यामुळे शिक्षकांची दक्षता एवम् निष्पक्षता कळते. विद्याभारती आपल्या विद्यार्थ्यांमध्ये आपला समाज, देश याविषयी प्रेमभाव निर्माण करते. अभिमान जागृत करते. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# छत्रपती संभाजीनगरमध्ये ७ मे रोजी 'मराठीचा गजर'

### २१ कविता संग्रहांसह पुस्तक प्रकाशन, काव्य स्पर्धेचेही आयोजन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने तमाम मराठी मनांची मान अभिमानाने उंचावली आहे. मराठी भाषेच्या सक्षमीकरणासाठी मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्था नेहमीच प्रयत्नशील असते व भाषा सक्षमीकरणासाठी अनेकाविध उपक्रमांचे नियमितपणे आयोजन करत असते. बुधवारी ७ मे २०२५ रोजी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे 'गौरव अभिजात मराठी २०२५' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा, २१ कवितासंग्रहाचे प्रकाशन आणि अभिजात मराठी विशेषांक प्रकाशन, तसेच पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित 'गौरव अभिजात मराठी २०२५' या भव्य प्रकाशन समारंभाच्या मुख्य आयोजक व उद्घाटक प्रा. डॉ. पद्मा जाधव-वाखुरे, शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी या आहेत. अध्यक्ष शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे असतील. मार्गदर्शक प्रसिद्ध शिवव्याख्याते, कीर्तनकार आणि संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक डॉ. बालाजी जाधव, प्रमुख अतिथी संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते ए. बी. पठाण, नरेश शेळके, सचिव, बुलडाणाच्या यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव नरेश शेळके, विश्वस्त प्रमुख अरविंद उरकुडे, अशोक लांडगे, संस्थापक अध्यक्ष राहुल पाटील, मुख्य परीक्षक, कोषाध्यक्ष सविता पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दुपारच्या सत्रात राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा होणार असून, या स्पर्धेत दिग्गज ४० कवी, कवयित्री सहभागी होणार आहेत. विजेत्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे रुपये ३०००, २०००, १००० रोख रक्कम तसेच १० उत्तेजनार्थ ५०० रुपये रोख सोबत सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व विशेषांक देण्यात येणार आहे.

मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्थेतर्फे सहप्रशासक वैशाली अंड्रस्कर, स्वाती मराडे, प्रा. तारका रुखमोडे, शर्मिला देशमुख घुमरे, संग्राम कुमठेकर, हंसराज खोब्रागडे, प्रतिमा नंदेश्वर, वृंदा करमरकर कार्यक्रमास सहकार्य करीत असून, कार्यक्रमाच्या आयोजनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील गौरव अभिजात मराठी आयोजन समितीतर्फे ज्येष्ठ साहित्यिका डॉ. पद्मा वाखुरे -जाधव, उद्योजक विजय शिर्के, कवयित्री वर्षा मोटे, व्याख्याते अकिल पठाण, ज्येष्ठ कवी विष्णू संकपाळ व प्रशांत ठाकरे सिलवासा हे आयोजन समितीचे पदाधिकारी परीश्रम घेत आहेत, अशी माहिती मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल पाटील व सचिव पल्लवी पाटील यांनी दिली.

# ओम जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याचे ध्वजारोहण संपन्न

खुलताबाद प्रतिनिधी : क्षेत्र वेरूळ २०.रविवार रोजी सकाळी अकरा वाजता श्रीक्षेत्र वेरुळ येथे जनार्दन स्वामी आश्रम तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर अक्षय तृतीया निमित्ताने वार्षिक ओम जगद्गुरु जनजांती जन्मस्थळ या सोहळाव्याचे २० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांच्या कृपाशीर्वाद व उत्तर अधिकारी आध्यात्मिक शिरोमणी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत अक्षय तृतीया निमित्त वार्षिक ओम जगद्गुरु जन शांती धर्म सोहळा २८ एप्रिल ते ५ मे या कालावधी श्री क्षेत्र वेरूळ येथे होणार आहे . या सोहळ्याची पूर्व तयारीचा आज शुभारंभ झाला यावेळी मुख्य ध्वजारोहण विधान परिषदेचे आमदार श्री संजय केनेकर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण झाले नंतर सत्संगामध्ये महंत सेवागिरी महाराज व जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांनी भाविकांना मार्गदर्शन केले प्रास्ताविक नागेश्वर नंद महाराज यांनी केले ह्यावेळी आश्रामिय सर्व संत उपस्थित होते ध्वजारोहण सोहळा संपन्न करण्यासाठी . राजेंद्र पवार, शिवां भाऊ अंगुलगावकर, रंगनाथ ठुबे मामा, जनार्दन अण्णा रिठे, एकनाथ दादा होळकर, राजू चव्हाण व संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व तालुका सेवकांनी विशेष परिश्रम घेतले दिनांक २८ तारखेला शुभारंभ होत असलेल्या अक्षय तृतीयेच्या या सोहळ्यामध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे अशी आव्हान जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले यावेळी जय बाबाजी भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. भव्य अशी बाबाजी पालखीची मिरवणूक गावातून काढण्यात आली यामध्ये पाडळसा येथील. महिलांनी डोक्यावर एकच रंगाचा साड्या घालून मिरवणुकी सहभागी झाली तरी विद्यार्थ्यांनी या मिरवणुकीमध्ये लेझीम खेळत व ढोल वाजवत मिरवणुकीत सामील झाले.



यावेळी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी बाबाजी सुद्धा मिरवणुकीत सामील झाले होते

यावेळी ६ ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली

## भाजपाच्या बिडकीन मंडळ तालुका अध्यक्षपदी विजय चव्हाण



बिडकीन दि २० एप्रिल पैठण तालुक्यातील बिडकीन येथे आज दि २० रविवार रोजी भारतीय जनता पक्षाच्या तालुका अध्यक्ष निवडची बैठक बिडकीन जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात येथे पार पडली याप्रसंगी पक्षाचे निवडणूक निरिक्षक जितेंद्र बाबा जैस्वाल, पैठण तालुका अध्यक्ष लक्ष्मन औटे ,यांच्या अध्यक्षतेखाली संघटनात्मक बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये बिडकीन मंडळ तालुका अध्यक्ष पदी माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांची निवड करण्यात आली यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते गणेश काळे , आप्पासाहेब शेळके, विठ्ठल मोगल, अभिजीत ढाकेफळे गणेश दाणे , बंडु ठाकुर , किशोर धर्मे , अविनाश राठोड, अजय राठोड , रामभाऊ खणसे, निलेश धडे , गोरख चव्हाण, माजी सरपंच मच्छिंद्र भालेकर , चंद्रकांत हुड , दिनेश तोतला, कृष्णा हिवाळे , अक्षय नरवडे, नितेश साकळकर , भारत दांडगे, भागचंद कोथिंबीरे, अर्जुन भवर,निकेश राऊत, सुनील गडदे, किशोर शिंदे, तसेच पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांची मंडळ तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वरील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी विजय चव्हाण शाल पुष्पहार घालून यांचे स्वागत करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# २५३ वर्षाची परंपरा असलेल्या भवानीमातेच्या यात्रेस २२ पासून सुरुवात

छत्रपती संभाजीनगर -



छत्रपती संभाजीनगर लागत असलेल्या मुकुंदवाडी या गावातील २५३ वर्षाची परंपरा असलेल्या भवानी मातेच्या यात्रेला मंगळवार दिनांक २२ एप्रिल पासून सुरुवात होणार असल्याचे आमदार नारायणराव कुचे यांनी सांगितले,या वेळी रामचंद्र नरोटे ,बाबासाहेब डांगे ,भाऊसाहेब जगताप, संतोष शिंदे, रतन साळवे, किशनराव ढुबे, मोतीलाल जगताप, यात्रा पंच कमिटी व मोठ्या संख्येने मुकुंदवाडी गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

२२ एप्रिल पासून यात्रेला सुरुवात होणार असून २४ एप्रिल पर्यंत ही यात्रा चालणार आहे. विविध कार्यक्रमाचे आयोजन मुकुंदवाडी गाव यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

पुढे बोलताना आमदार कुचे यांनी यात्रेविषयी माहिती देताना दिनांक २२/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी ५ वाजता देवीचा महाभिषेक व आरती दुपारी १२.३० वाजता काकडा आरती, दुपारी २.३० वा. देवीचा भंदे खेळण्याचा कार्यक्रम. सायंकाळी ५.३० वाजता नवसाच्या बारागाड्य ओढण्याचा कार्यक्रम व नवसाचा त्रिशुल टोचण्याचा कार्यक्रम, संध्याकाळी ७.०० वाजता देवीचा गोंधळ व आरती, रात्री ८.३० वाजता देवीची पालखी, छबीना मिरवणूक, भवानीदेवी मंदिरापासून मारुती मंदिरा पर्यंत, रात्री कलगीतुरा सामना व समाज प्रबोधनाचा कार्यक्रम होईल. दिनांक २३/०४/२०२५ बुधवार रोजी दुपारी ३ ते ७ वाजेपर्यंत महाप्रसादचा कार्यक्रम संध्याकाळी ७.३० ते १० वाजेपर्यंत युवाचार्य ह.भ.प. प्रभाकर महाराज शास्त्री यांचा किर्तनाचा कार्यक्रम होईल. रात्री ८ ते १० वाजता ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम.

दिनांक २४/०४/२०२५ गुरुवार रोजी दुपारी ३ ते ८ वाजेपर्यंत जंगी कुस्त्यांच्या कार्यक्रमाचे व इतर कार्यक्रम होणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन देवीचे पुजारी व व्यवस्थापक, देविदास कुचे किसनजी कुचे, बन्सीलाल कुचे व समस्त गावकरी मंडळी यांनी केले आहे.

## एमजीएममध्ये उन्हाळी सुट्ट्यात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकण्याची संधी

### १०, ११ व १२ च्या विद्यार्थ्यांसाठी समर स्किल सर्टिफिकेट प्रोग्रॅम

छत्रपती संभाजीनगर, दि.२० : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थ्यांना स्वत: तील कौशल्य वाढविण्यास मदतशील ठरणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम 'समर स्किल प्रोग्रॅम' शिकण्याची संधि उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'ए समर ऑफ डिस्कव्हरी - लर्न व्हॉट यु लव्ह' या संकल्पनेवर आधारित या अभ्यासक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्यावतीने प्रमाणपत्र व दोन क्रेडिट्स प्रदान केले जाणार आहेत. या कौशल्य विकास अभ्यासक्रमासाठी १० वी, ११ वी आणि १२ वी तसेच त्यावरील वर्गातील विद्यार्थी आपला सहभाग नोंदवू शकतात. यात अनेक नाविन्यपूर्ण विषयांचा समावेश आहे.

**या अभ्यासक्रमांत समाविष्ट असलेले अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहेत :** फॅशन फॉरवर्ड - बेसिक्स ऑफ फॅशन डिझाईन आणि स्टायलिंग, क्रिएटिव्ह माईंड्स - वेबसाईट डिझायनिंग आणि डेव्हलपमेंट, गेम ऑन! - इन्ट्रुडक्शन टू गेम डिझाईन आणि डेव्हलपमेंट, स्मार्ट स्किल - मायक्रोसॉफ्ट ऑफिस (बेसिक ते ॲडव्हान्स), फ्रेम इट राईट - फोटोग्राफी व एडिटिंग, मोशन मॅजिक - व्हिडिओग्राफी व एडिटिंग, दि व्होकल स्टुडिओ - गायन, म्युझिकल इन्स्ट्रुमेंट्स - गिटार व पियानो, स्पीक ग्लोबल - जर्मन, फ्रेंच, जपानी, अरेबिक भाषा शिक्षण, ॲपक्ट लाईक अ प्रो - नाट्य, अभिनय व चित्रपट, प्रिंट द फ्युचर - ३ डी डिझाईन व प्रिंटिंग, ड्रोन एक्स्प्लोर - ड्रोन बनवणे, उडवणे व त्याचे तंत्रज्ञान.

प्रत्येक अभ्यासक्रमासाठी नाममात्र प्रवेश फी असणार आहे. विद्यार्थ्यांनी या उन्हाळी कौशल्य अभ्यासक्रमांसाठी मोठ्या संख्येने नोंदणी करावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी www.mgmu.ac.in या संकेतस्थळास भेट द्यावी अथवा ९३७१७१०१४६/ ९३७१७१०१४७ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

## मंडळ अध्यक्षपदी दत्ता वाकडे यांची निवड



पैठण दि २० : भारतीय जनता पक्षाच्या पक्षवाढीसाठी आपल्या सर्कल सह पैठण तालुक्यात चांगले काम करणारे दत्ता पाटील वाकडे यांची पिंपळवाडी,आपेगांव विहामांडवा या मंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

संघटन पर्व प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या तसेच निवडणूक अधिकारी सर्जे राव मेटे ,पैठण तालुकाध्यक्ष लक्ष्मण पाटील औटे,नगराध्यक्ष सुरज लोळगे, उपजिल्हाध्यक्ष भाऊसाहेब काळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत मंडळ अध्यक्षाच्या निवडीमध्ये पैठण तालुक्यातील पिंपळवाडी, आपेगाव, विहामांडवा या मंडळ अध्यक्षपदी दत्ता पाटील वाकडे यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचे विशाल भैय्या पोहेकर, प्रशांत आव्हाड हरी पंडित नवथर विलास संत ज्ञानेश्वर गाभुड सुरज घुले अंनत औटे वंसत चोरमले राहुल बाबर, दिगंबर नाटकर बाळूभाऊ पोपळघट, दत्ता पाटील नरके,कृष्णा शिंदे, बाळू कोरटकर आदींसह भाजपा पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.

# तंत्रज्ञानामुळे बागा जगविण्यास मदत : डॉ. पाटील

### जिल्ह्यात बागा वाचवा मोहीम

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी - उपलब्ध असणाऱ्या तंत्रज्ञानाचा अन् पाण्याचा काळजीपूर्वक वापर केल्यास कमी पाण्यावरदेखील फळबागा वाचविण्यास हमखास मदत होते, असे प्रतिपादन मोसंबी संशोधन केंद्र व हिमायतबाग फळ संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संजय पाटील यांनी येथे केले.

मोसंबी संशोधन केंद्रातर्फे आयोजित 'बागा वाचवा मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील कंकराळा, माळेगाव,जरंडी, निंबायती (ता. सोयगाव) आदी परिसरातील बागांना रविवारी, २० एप्रिल रोजी भेटी देऊन मार्गदर्शन करताना पाटील बोलत होते. या वेळी मोसंबी बागायतदार मोतीलाल वाघ, संभाजी पाटील, सचिन पाटील, सुभाष वाघ, जीवनराम वाघ, लच्छू चव्हाण, गणेश काळे, दिलीप पाटील, विजय पाटील आदींची उपस्थिती होती. डॉ. पाटील म्हणाले, तालुक्यात जवळपास २ हजार ८६७ हेक्टर क्षेत्रावर मोसंबी फळपीक आहे. हवामान बदलामुळे तापमानवाढ होत आहे. आतापर्यंत काळजीपूर्वक बागा जतन केल्या आहेत, त्यासाठी भरपूर कष्टदेखील घेतले आहेत. सध्या पाणीटंचाई जाणवत आहे, अशा परिस्थितीत धीर न सोडता बागा तोडण्याची चूक करू नये.आच्छादन, ठिबक सिंचन, फळांची विरळणी, बाष्पोत्सर्जकाचा वापर, मटका सिंचन, हायड्रोजेल, केओलीन, बोर्डोपेस्ट आदींचा वापर केल्यास बागा जिवंत ठेवण्यास मदत मिळते. पाण्याची खूपच टंचाई जाणवत असल्यास अंबिया बहराची सर्व फळे तोडून बागा वाचविण्याचे आवाहन देखील डॉ. पाटील यांनी केले.

## पत्रकारांना पेन भेट देऊन जयंती साजरी

खुलताबाद प्रतिनिधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते विरेंद्र सिताराम वाघ यांनी अनोखा पुढाकार घेत पत्रकारांना पेन वाटून जयंती साजरी केली. यातून त्यांनी डॉ.आंबेडकरांनी दिलेले शिक्षण आणि लेखनाचे महत्त्व हा संदेश देण्याचा प्रयत्न केला. समाजात जनजागृती करणाऱ्या पत्रकारांचा गौरव करताना त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून त्यांचा आदर्श पुढे नेण्याच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला. या वेळी माजी नगराध्यक्ष रवींद्र ढवळे व सरपंच नितीन जाधव यांच्या हस्ते पत्रकारांना लेखणीचे वाटप करण्यात आले. विरेंद्र वाघ यांच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मराठा प्रतिष्ठानचा घोसला गावातील उपक्रमात ४२ गावांना पाण्याच्या टाक्या

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१९ एप्रिल



उन्हाच्या कडाक्यात नागरिकांच्या घशाची कोरड दूर करण्यासाठी मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान पाटील गव्हांडे यांनी शनिवारी मान्यवरांच्या हस्ते ४२ गावांसाठी पिण्याच्या पाण्याच्या एक हजार व पाचशे लिटर्सच्या पाचशे साठवण टाक्या मोफत वाटप करून दिलासा दिला

शनिवारी दुपारी एक वाजता झालेल्या घोसला गावातील या कार्यक्रमात डॉ. रुपेश पाटील(दीपस्तंभ जळगाव) ओमकार गिरी महाराज(मुरडेश्वर संस्थान) मुंबई सायबर सेल चे उपनिरीक्षक निवृत्ती बावसकर,माजी उपसभापती चंद्रकांत पाटील,संजय पाटील,मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान पाटील गव्हांडे,सरपंच गणेश माळी,प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे,तालुकाध्यक्ष विजय चौधरी,ग्रामपंचायत सदस्य सोमु तडवी,माजी सरपंच सुरेखा तायडे(गलवाडा) आदींची प्रमुख उपस्थिती होती प्रस्तवविकात सोपान पाटील गव्हांडे यांनी समाजाचे देणे लागतो त्यासाठी जनसेवा हीच ईश्वर सेवा हा उद्देश बाळगून हा उपक्रम राबविला असल्याने सांगितले डॉ.रुपेश पाटील यांनी खेडेगावात शांतता काय असते हे पहायचे असेल तर घोसला या पावन भूमीत या असे सांगून हा स्तुत्य उपक्रम असल्याचे सांगितले मुख्याध्यापक संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले दरम्यान तालुक्यातील ४२ गावांना मान्यवरांच्या हस्ते पाचशे टाक्या वाटप करण्यात आल्या ऐन पाणी टंचाईच्या छायेखाली असलेल्या गावांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्यामुळे या गावातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे यावेळी मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे,तालुकाध्यक्ष विजय चौधरी, प्रमोद वाघ, ज्ञानेश्वर गवळी,ज्ञानेश्वर युवरे,गणेश गवळी,अप्पा वाघ,गणेश तायडे,अमोल बोरसे,संदीप गव्हांडे,संदीप पाटील,समाधान गव्हांडे,चरण वाघ,आबा कोळी,एकनाथ गवळी,बंडू बावसकर,आदींनी पुढाकार घेतला होता.

## भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी योगेश धर्माधिकारी

पैठण दि २० :- ब्राम्हण सभा सभागृह याठिकाणी आयोजित बैठकीत पैठण तालुका भगवान परशुराम जन्मोत्सव २०२५ उत्सवाची कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे.

या कार्यकारिणीत अध्यक्षपदी - योगेश धर्माधिकारी, उपाध्यक्ष -विशाल पोहेकर, यश कुलकर्णी , सचिव - परीक्षेत गोसावी सचिन काका कावसानकर , सहसचिव -कैलास देशमुख,सखाराम भागवत, कार्याध्यक्ष संतोष जोशी, रवी मामा जोशी, ओंकार जोशी, सहकार्याध्यक्ष गणेश कुलकर्णी उत्कर्ष कुलकर्णी, स्वागत अध्यक्ष डॉक्टर पुष्कर गोसावी कपिल काका कावसानकर, सह स्वागत अध्यक्ष देवेंद्र शिवपुरी ओंकार दाने , कोषाध्यक्ष मंदार दादा उज्जैनकर प्रकाश काका टाकळकर, सह कोषा अध्यक्ष समीर शुक्ल सम्राट वानोळे तेजस आखेगावकर हर्षवर्धन पाटील गणेश देवा साळजोशी प्रशांत देशपांडे सौरभ पोहेकर ऋषिकेश गर्गे ललित महाजन सोनू खिस्ती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समस्त ब्राह्मण समाज पैठण, अखिल भारतीय पेशवा संघटना पैठण यांच्या मार्गदर्शनाखाली हा जन्मोत्सव पार पडणार आहे.

# सीपीएमच्या अस्तित्वाच्या प्रश्नाचे बेबींसमोर आव्हान!

## प्रासंगिक

**राहुल गोखले**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (सीपीएम) राजकीय भवितव्य काय, याची चिंता आता त्या पक्षाचे नवे सरचिटणीस मरियम अलेक्झांडर बेबी या ७१ वर्षीय नेत्याला करावी लागेल. मदुराई येथे नुकत्याच झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात बेबी यांची निवड सरचिटणीसपदी करण्यात आली. अर्थात त्यांची ही निवड एकमताने झालेली नाही. पॉलिट ब्युरोमधील पश्चिम बंगालच्या सदस्यांचा कल महाराष्ट्रातील डावे नेते अशोक ढवळे यांच्या गळ्यात ती माळ पडावी याकडे होता. पण बेबी यांच्या पारड्यात बहुतांशी मते पडली आणि ते त्या पदावर निवडून गेले. याचे एक कारण हेही आहे की, बेबी केरळमधील आहेत आणि संपूर्ण देशात डाव्यांची सत्ता आता केवळ केरळपुरती मर्यादित झाल्याने पॉलिट ब्युरोमध्ये केरळचा वरचष्मा असणे स्वाभाविक. त्याची एक खूण हीदेखील आहे की, वयाची पंचाहत्तरी ओलांडलेल्यांना पॉलिट ब्युरोमधून निवृत्त करण्याचा प्रघात असल्याने माजी सरचिटणीस प्रकाश करात प्रभृतींना निवृत्त करण्यात आले तरी केरळचे ८० वर्षीय मुख्यमंत्री पी. विजयन यांचा मात्र अपवाद करण्यात आला. बेबी हे प्रारंभी विजयन यांचे पक्षांतर्गत विरोधक असले, तरी आता त्यांनी विजयन यांच्याशी जुळवून घेतले आहे. आता बेबी यांना सीपीएम पक्षाची केवळ केरळपुरती समीकरणे पाहून चालणार नाही. सीपीएम पक्षाच्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला असल्याने त्यांना त्या संकटाशी लगेचच भिडावे लागेल. मुद्दा ते नेमके हे कसे करणार हा आहे.

डाव्या पक्षांना देशभरात सरसकट कधीच जनाधार लाभलेला नव्हता. तथापि, पश्चिम बंगाल, त्रिपुरा आणि केरळ ही तीन राज्ये बराच काळ डाव्यांचे बालेकिल्ले होते. त्या बळावर ते केंद्रातील काँग्रेस किंवा तिसऱ्या आघाडी सरकारला वेठीस धरत असत. परंतु पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने डाव्यांच्या सत्तेला सुरुंग लावला आणि कधी स्वबळावर तर कधी काँग्रेसशी आघाडी करूनही डाव्यांना आपले पूर्वीचे स्थान प्राप्त करता आलेले नाही. याचे एक कारण म्हणजे त्या पक्षाने पश्चिम बंगालमध्ये वाढविलेली आपली सत्ताकेंद्रित संघटना. संघटनेला तळागाळात स्थान होते हा आभास सत्ता गेल्यानंतर संघटनेत आलेल्या विस्कळीतपणाने आणि कमकुवतपणाने अधोरेखित केला. त्रिपुरा तुलनेने छोटे राज्य. पण तेथे मतदारांनी भाजपाला सत्ता दिली आणि डाव्यांचा गाशा गुंडाळला. आता उरले केरळ. तेथे काँग्रेसप्रणीत आघाडीशी डाव्या आघाडीची थेट लढत आहे. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसची सलगी आणि केरळमध्ये काँग्रेसशी उभा दावा अशा पेचात डावे आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत (२०२१) विजयन यांच्या नेतृत्वाखाली डाव्यांनी सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळविली हे खरे; पण आता पुढच्या वर्षी होणाऱ्या निवडणुकीत डाव्यांना त्याची पुनरावृत्ती करण्यात यश येईल का, याबद्दल साशंकता आहे. याचे कारण गेल्या वर्षी (२०२४) झालेल्या लोकसभा निवडणुकीत केरळमध्ये काँग्रेसने बजावलेली लक्षणीय कामगिरी. २० पैकी १८ जागा काँग्रेसप्रणीत आघाडीने जिंकल्या होत्या. त्यात काँग्रेसचा १४ जागांचा वाटा होता. पुढील वर्षी पश्चिम बंगाल आणि केरळ या दोन्ही राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. बेबी यांची तीच पहिली कसोटी असणार आहे.

डाव्यांची ही इतकी केविलवाणी घसरण का झाली, याचे आत्मपरीक्षण त्या पक्षाच्या नेतृत्वाने करायला हवे. बेबी यांनी तर आवर्जून करावयास हवे. या घसरणीचे एक कारण म्हणजे जनतेपासून तुटलेली नाळ. दुसरे तितकेच महत्त्वाचे कारण म्हणजे



अकारण आणि अवाजवी वैचारिक अहंगंड आणि परिणामतः केलेल्या अनेक घोडचुका. १९९६ साली तिसऱ्या आघाडी सरकारचे नेतृत्व सीपीएमचे वरिष्ठ नेते ज्योती बसू यांनी करावे असा प्रस्ताव पुढे आलेला असताना प्रकाश करात, सीताराम येचुरी, इ. के. नायनार, व्ही. एस. अच्युतानंद अशांनी त्या प्रस्तावास खोडा घातला. त्यानंतर काही काळाने बोलताना स्वतः बसू यांनी ती घोडचूक असल्याचे कबूल केले होते. २००८ साली केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारने अमेरिकेशी अणुकरार करण्याचा प्रस्ताव आणला तेव्हा सीपीएमने त्या सरकारला वेठीस धरले होते; एवढेच नव्हे तर लोकसभा सभापती असलेले सीपीएम पक्षाचे सोमनाथ चॅटर्जी यांनी पदाचा राजीनामा द्यावा, असा दबाव आणला होता. पण सभापतिपद हे पक्षातीत असते, अशी भूमिका घेत चॅटर्जी यांनी पक्षादेश मानण्यास नकार दिला तेव्हा त्यांची पक्षाने हकालपट्टी केली. विचारधारेच्या अहंगंडातून झालेली ती कारवाई होती. अणुकरार संसदेत मंजूर झाला. मात्र परिणाम झाला तो पुढील निवडणुकीत डाव्यांच्या कामगिरीवर.

२००४ सालच्या लोकसभा निवडणुकीत ४३ जागा जिंकणाऱ्या सीपीएमचा आलेख २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ हा अनुक्रमे १६, ९, ३ व ४ असा कमालीचा घसरत गेला आणि मतांचे प्रमाण दीड-दोन टक्क्यांवर येऊन ठेपले आहे.

आताही सीपीएम पक्षाचा कल पक्षबांधणी आणि विस्तारापेक्षा भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर शरसंधान करण्यात धन्यता मानण्याकडेच आहे. मदुराई अधिवेशनात बोलताना स्वागत समितीचे अध्यक्ष के. बालकृष्णन यांनी तामिळनाडूने भाजपा किंवा संघाला कसे नाकारले आहे, याच्या कथा रंगविल्या. वास्तविक संघाचा विस्तार तामिळनाडूत अनेक वर्षे होत आहे. भाजपाला जागा जिंकता येत नसल्या, तरी २०१९ च्या तुलनेत भाजपाला मिळालेल्या मतांच्या प्रमाणात २०२४ साली साडेसात टक्के वृद्धी झाली आहे. सीपीएमने द्रमुक आघाडीचा घटक पक्ष म्हणून निवडणुका लढविल्या आणि त्या पक्षाला अवघ्या दोन जागा जिंकता आल्या. तेव्हा खरे तर सीपीएमचा भर हवा तो आपल्या पक्षाचा जनाधार का घटतो आहे, याचे मंथन करण्यावर; त्याऐवजी त्या पक्षाला समाधान आहे ते भाजपाला तामिळनाडूत जागा जिंकता आल्या नाहीत याचे. पण त्याच भाजपाने केंद्रात सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली आहे आणि डाव्यांसमोर राजकीय भवितव्याचे संकट उभे राहिले आहे, याचे बालकृष्णन यांना सोयीस्कर विस्मरण झाले. प्राधान्य पक्षबांधणीला द्यायचे की भाजपाला कोणत्या राज्यात अपयश येते हे दुरून पाहण्यात आनंद मानण्यास याची निवड बेबी यांनी करायची आहे.

जगभरात डाव्यांचा सत्ताप्रभाव ओसरत आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण याचा परिणाम डाव्यांच्या पारंपरिक वैचारिक आधारांना धक्का देण्यात झाला आहे. दुसरीकडे स्थलांतरितांच्या मुद्यापासून राष्ट्रवादाच्या मुद्यापर्यंत डाव्यांच्या विचारसरणीला जनता जगभरात विरोध करीत आहे. अमेरिकेपासून जर्मनीपर्यंत डाव्यांना निवडणुकीत दणका बसला आहे आणि उजव्या विचारसरणीला वाढता जनाधार लाभत आहे. भारत म्हणजे रशिया किंवा चीन नव्हे. डाव्यांच्या जगभरात ओसरत असलेल्या प्रभावातून बोध घेऊन आपल्या वैचारिक मांडणीचा पुनर्विचार करायचा की त्याच रूढी-प्रियतेत अडकायचे, याचा विचार सीपीएम आणि बेबी यांना करायचा आहे. पश्चिम बंगालमध्ये डाव्यांचे सत्तेत पुनरागमन होण्याची शक्यता धूसरच. केरळही हातचे गेले तर देशभरात कोणत्याही राज्यात सत्तेत नसलेला पक्ष असा सीपीएमचा लौकिक होईल. अशा पक्षाचे पुढे नेमके काय करायचे हा सवाल बेबी यांना आजपासूनच सतावत असणार. निवडणुकीतील यशापयश हा पक्षाच्या आणि विचारधारेच्या स्वीकारार्हतेचा महत्त्वाचा निकष असतो, यात शंका नाही. तथापि तो एकमेव निकष नव्हे. मुळात ज्या विचारधारेवर पक्ष चालतो त्या विचारधारेची प्रासंगिकता उरली आहे का की तिचा पुनर्विचार आणि शक्य तर पुनर्मांडणी करणे अगत्याचे हा पक्ष नेतृत्वाचा कस आणि धमक यांची परीक्षा पाहणारा निकष. बेबी ती धमक दाखविणार का यावर त्यांचे आणि सीपीएमचे राजकीय भवितव्य अवलंबून आहे.

९८२२८२८८१९

# वाचनसंपन्न होण्यासाठी...

## साहित्य


**अर्चना कुडतरकर**

भाषा, पुस्तके आणि साहित्यिक ही सगळी वाचनाशी संबंधित असणारी अंगे एकत्र येण्याचा आणि सुरेख संगम साजरा करण्याचा अलिकडचा योग सुखावणारा आहे. यातील परस्परसंबंध आणि वाचनानंद वाचकांसाठी कोणकोणत्या अंगाने महत्त्वपूर्ण असतो, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. जगण्यावर आणि जगण्याच्या पद्धतीवर प्रभाव टाकणारी ही माध्यमे जगण्याचे एक अविभाज्य अंग आहेत. त्यामुळे या योगाचे औचित्य न साधणे हे करंटेपणाचे लक्षण ठरेल.

वाचनाची प्रक्रिया बाह्य कृतीप्रमाणेच अंतर्गत पातळीवरही होत असते. म्हणजेच वाचन करताना आनंद मिळतो; त्याचबरोबर मनावरही आपसूक परिणाम होतो. ही संपूर्ण प्रक्रियाच भावनांचे विरेचन होण्यासाठी साह्यभूत ठरते. एका अर्थी वाचन हा वाचकाचा एक अंतर्गत प्रवास असून साहित्यकृती, पुस्तके यांना समांतर जाणारा असतो. त्यामुळे वाचनाचा वाचकाच्या मनावर दीर्घकालीन परिणाम होतो. यातून मनातील द्वंद्व, आनंद वा अशा कोणत्याही भावना अभिव्यक्त होत राहतात. भले ही अभिव्यक्ती मनातल्या मनात असली, तरी त्याचा प्रभाव जाणवल्याखेरीज राहत नाही. नाटक, चित्रपट यासारख्या प्रयोगशील कला पाहताना पडद्यावरील दृश्य पाहून आपल्या आयुष्यातही याला समांतर काही घडत असल्याचा विचार मनात येत असतो आणि तशीच काहीशी प्रक्रिया वाचनावेळीही घडत असते. कथा, कादंबरी, कविता आदी वाचताना त्याबद्दल आपल्यालाही काही म्हणायचे आहे, असे वाटते आणि मनोमन त्या साहित्यकृतीशी बंध जुळतात. कातरवेळी हमखास अशा ओळी स्मरतात आणि साहित्यसंबंध दृढ होतो, अधिक जवळचा वाटतो.

हाच धागा हाती घेत बोलायचे तर अरविंद गोखले यांची 'कातरवेळ' नामक कथा मला प्रत्येक कातरवेळी आठवते आणि वाचलेल्या गोष्टी किती प्रदीर्घ काळ मनात टिकून असतात, याचा साक्षात्कार होतो. या कथेतील 'आक्का' नवविवाहित आहे. सासरी रमू पाहत आहे. अशातच माहेरपणाला आल्यानंतर घरात फिरताना तिला बालपणीचे दिवस आठवतात. मनात कोपऱ्या-कोपऱ्यातल्या आठवणींची गर्दी होते. असेच काही शोधत असताना इतिहासाचे पुस्तक आणि त्यात ठेवलेले पान तिच्या हाती लागते आणि याच टप्प्यावर कथा कलाटणी घेते. पात्राबरोबरच वाचकांचे मनही फिरते, कारण नकळत वाचकांनाही आपल्या कातरवेळेचा प्रवास नायिकेच्या प्रवासाशी समांतर असल्याचे जाणवत असते. इतिहासाच्या पुस्तकात जपलेल्या तिच्या आठवणी त्यांना आपण जपलेल्या गोष्टींचे स्मरण करून देत असतात. हा अनुभव समांतर असला, तरी वेगवेगळा असतो. पण तोच वाचकाला सर्जनशील बनवतो आणि हेच महत्त्वाचेही असते. कारण शेवटी वाचन हीदेखील एक सर्जनशीलता असते, असे आपण म्हणतो. असे असल्यामुळेच आपण एखाद्या कलाकृतीचा अर्थ लावतो, अर्थनिर्णयातून शिकतो आणि स्वत:ला उन्नत करतो. स्वाभाविकच ही प्रक्रिया साहित्यकृतीलाही उन्नत करून जाते. अशा एक ना अनेक साहित्यकृती आज वाचकांच्या भावविश्वात महत्त्वपूर्ण स्थान राखून आहेत.

वैशिष्ट्य म्हणजे वयाच्या एकेका टप्प्यानुसार वाचलेल्या साहित्याचे वेगवेगळे आकलन होते. म्हणजेच एखादी कथा लहानपणी वाचली तर वेगळा अर्थ निघतो, पण तीच कथा प्रौढावस्थेत वाचली तर वेगळा अर्थ समोर येतो. आपल्या म्हणायचे आहे ते म्हणता येत नसताना असे साहित्य, पुस्तके व्यक्त होण्यास साथ देतात. वाचनातून दर वेळी पुन:प्रत्ययाचा आनंद मिळतो. तो अनुभवण्याच्या निमित्ताने एक विश्व निर्माण होते. जगताना अनेक अनुभवांना सामोरे जात ते कसे स्वीकारायचे, कसे हाताळायचे, कसे वागायचे अशा एक ना अनेक गोष्टींचे भान वाचनातून मिळते. म्हणूनच वाचकांनी 'क्रिएटिव्ह रीडिंग'चा ध्यास धरला पाहिजे, असे वाटते.



लेखिका सानियाच्या बऱ्याच कथांमधून मनाचा धांडोळा घेणे विशेष भावायचे आणि मनाच्या खूप आतपर्यंत चाललेले सगळे सुंदर पद्धतीने शब्दबद्ध करण्याची तिची हातोटीही आवडायची. यातूनच अशा प्रकारे आपल्यालाही भावना शब्दबद्ध करता येतील का, हा विचार मनात डोकावला आणि मी लेखन, संपादनाकडे वळले. म्हणूनच वाचनातून आपल्याला एखादा बिंदू सापडतो असे वाटते. वाचन भावना अभिव्यक्त करण्याचे, त्या पडताळून पाहण्याचे माध्यम असते तसेच ते स्वत:ला अभिव्यक्त करायलाही शिकवते. मग ते बोलण्यातून, लिखाणातून वा अन्य माध्यमातून असेल... मात्र वाचनाने माणूस अभिव्यक्त होतो, ही बाबही मला अत्यंत महत्त्वाची वाटते. या अर्थाने पुस्तके आपल्याला चांगला हात देतात आणि पुढे नेतात. त्या पात्रांमध्ये आपण गुंततो, त्यांच्याबरोबर फिरतो. जसे की, 'तुंबाडचे खोत' वाचताना मी त्यातील पात्रांबरोबर फिरले. त्यामुळे प्रत्यक्ष पाहिलेले नसले तरी पेंडसे यांनी या कादंबरीतून साकारलेल्या हर्णे बंदर आणि त्याच्या आसपासच्या परिसराचे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले. प्रत्यक्ष तिथे गेल्यानंतर त्या अनुभवाच्या पुन:प्रत्ययाचा आनंद अर्थातच खूप मोठा होता. म्हणूनच केवळ पुस्तक दिनाच्या निमित्तानेच नव्हे तर प्रत्येकाने दररोज काही ना काही वाचायला हवे. हे सगळे अनुभव घेतले पाहिजेत.

लोकांना वाचनाची गोडी लावण्यासाठी आज अनेक उपक्रम राबवले जातात. 'पुस्तकांचे गाव' ही त्यातूनच पुढे आलेली संकल्पना होती. आता रत्नागिरीमध्ये अशाच पद्धतीने उपक्रम राबवण्याचा प्रयत्न चर्चेत आहे. मात्र असे प्रयोग दोन-चार जिल्ह्यांमध्ये होण्यापेक्षा प्रत्येक शहर, गावामध्ये, तालुका पातळीवर व्हायला हवेत. तसे झाल्यास त्याचा अधिक फायदा होईल. मध्यंतरी चंद्रपूरमधील एका छोट्या गावात राहणाऱ्या मुलाशी बोलणे झाले. तो पुस्तकांसाठी आसुसलेला होता. त्याला भरपूर वाचायचे होते. ओघात तो म्हणाला, कादंबरी नावाचा साहित्यप्रकार अस्तित्वात असल्याचे मला पुण्यात आल्यावर समजले. तेव्हा मी २२ वर्षांचा होतो...! हे ऐकून मनात चर्रर... झाले. आपल्याकडील वास्तव समोर आणण्यासाठी हे एक उदाहरणच पुरेसे आहे. त्यामुळे पुस्तक दिनी तरी यावर गांभीर्याने विचार होणे गरजेचे वाटते.

मुलांसाठी वेगळी वाचनालये असणे आणि त्यात केवळ मुलांसाठीचे साहित्य असणेही गरजेचे आहे, कारण अनेकदा बाल गट, शिशू गट, कुमारवयीन मुले, पौगंडावस्थेतील मुले यांच्यासाठी असणाऱ्या साहित्यातील फरक कळत नाही. म्हणूनच हे वेगवेगळे विभागून पुरवल्याचा चांगला परिणाम बघायला मिळू शकतो. यातून मुले वाचनाचे वेगवेगळे टप्पे सहज ओलांडतील आणि त्यांना वाचनाची गोडी लागेल. 'प्रथम'ने अशा प्रकारे एक पुस्तक चळवळ चालवली होती. पण तिचा आवाका कमी होता. लोकसहभाग वाढला तर अशा चळवळींची संख्याही वाढेल. अलिकडील पुस्तक महोत्सवात आम्ही मुलांसाठी नाट्यछटा, कथेची पुस्तके १० रुपयांमध्ये उपलब्ध करून दिली होती. तेव्हा ग्रामीण भागातील शिक्षक विद्यार्थ्यांसाठी पदरमोड करून ती घेऊन जात होते. हे चित्र निश्चितच सकारात्मक आहे.

**आठवण विल्यम शेक्सपिअरची**

विल्यम शेक्सपिअर हे जागतिक कीर्ती मिळवलेले नाव. त्यांनी लिहिलेल्या साहित्यकृती वाचण्याचा अनुभव घेता आला नसला, तरी सदानंद रेगे वा त्यांच्यासारख्या मंडळींनी शेक्सपिअर यांच्या नाटकांचे केलेले स्वैर रूपांतर वाचनात आले. त्यांच्या साहित्यामध्ये अनेक नात्यांचे गुंते तसेच मनाचा वेध घेतलेला दिसतो. नात्यांचा मानसशास्त्रीय आढावा घेत त्यांनी केलेले लेखनही भावनांचे विरेचन करणारे आहे. मानसशास्त्राचे शिक्षण घेताना मी हा अनुभव घेतला आहे. आपल्याकडे अशा प्रकारचे साहित्य नव्हते. अर्थात हा संस्कृतीमधील बदलाचा परिणाम आहे. यात दोहोंची तुलना करण्याचा हेतू नाही, पण संस्कृती, प्रतीके वेगळी असल्यामुळे शेक्सपिअरच्या साहित्याने आपल्याला नेहमीच वेगळा अनुभव दिला, हे नाकारून चालणार नाही. एकीकडे असे असताना आपण इंग्रजी भाषा दिनही साजरा करत आहोत. या भाषेतील साहित्यामधूनही आपल्याला वेगळ्या संस्कृतीचा परिचय होतो. मानवी स्वभावाचा वेगळा अनुभव मिळतो. मराठी मनावर तर इंग्रजीचा मोठा प्रभाव आहे. आपल्याकडील अनेकांनी इंग्रजीतून केलेले लेखनही महत्त्वपूर्ण आहे. त्याची दखल घ्यायलाच हवी.

## रविवारची पत्रे

### तरुण भारतमधील खांदेपालट

श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेच्या वतीने गेल्या पंचाहत्तर वर्षांपासून नागपुरातून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी नागपुरातील ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक शैलेश पांडे यांची नियुक्ती तरुण भारत परिवारात नवचैतन्य निर्माण करणारी आहे. आतापर्यंतचा अनुभव असा आहे की, तरुण भारतचे मुख्य संपादक स्व. भाऊसाहेब माडखोलकर यांचा अपवाद वगळता वयाची साठ वर्षे पूर्ण होताच तरुण भारतचे संपादक निवृत्त होतात. आदरणीय स्व. मा. गो. वैद्य यांनीच ही परंपरा सुरू केली. मा. गो. संपादकपद भूषविण्यासाठीच हिस्लॉप कॉलेजमधील जास्त पगाराची नोकरी सोडून तरुण भारतमध्ये रुजू झाले होते. पण ते भाऊसाहेब माडखोलकरांच्या निवृत्तीनंतर लगेच मुख्य संपादक झाले नाहीत. भाऊसाहेबांसोबत कार्यकारी संपादक असलेले स्व. तात्यासाहेब करकरे यांना प्रथम मुख्य संपादक करा, त्यानंतर मी ते पद स्वीकारीन अशी भूमिका त्यांनी घेतली व तात्यासाहेब करकरे यांच्या वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मुख्य संपादकपद स्वीकारले. एवढेच नाही तर स्वतःची वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर लगेच ते पद सोडले.

मागोंनंतर मुख्य संपादक झालेले स्व. मामासाहेब घुमरे म्हणजे तभा सहकाऱ्यांचे मायपोट. कुणालाही, कोणतीही अडचण आली तर तो मामासाहेबांकडे गेला की, समस्या सुटली म्हणून समजा अशी मामासाहेबांची भूमिका राहत असे. तटस्थ तरीही खंबीर संपादक कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मामासाहेब. त्यांनीही साठ वर्षांचा नियम कटाक्षाने पाळला. तरुण भारतचे सगळे कर्तेधर्ते आणिबाणीच्या काळात मिसाबंद झाले असताना मामासाहेबांनी संयमपूर्वक तरुण भारतचा सांभाळ केला. साठ वर्षानंतरच्या निवृत्तीची भूमिका स्व. वामनराव तेलंग यांच्या निवृत्तीनंतर मुख्य संपादक झालेले सुधीर पाठक यांनीही घेतली. खरे तर त्यांच्या निवृत्तीची तारीख साठ वर्षांनंतरची होती. आणखी काही काळ ते मुख्य संपादक राहू शकले असते. पण साठ वर्षे पूर्ण होताच निवृत्त होण्याचा आग्रह त्यांनी धरला व तो अंमलातही आणला.

त्यांच्यानंतर गजानन निमदेव हे मुख्य संपादक झाले. तेही या नियमाला अपवाद राहिले नसते, पण त्यांची विभागीय माहिती आयुक्त म्हणून राज्य सरकारने नियुक्ती केल्याने त्यांना तरुण भारतच्या जबाबदारीतून मुक्त व्हावे लागले. मेहकरसारख्या गावातून येऊन त्यांनी तरुण भारतच्या माध्यमातून केलेल्या कार्यामुळे त्यांना मुख्य संपादक होता आले ही त्यांच्यासाठी अभिनंदनीय बाबच होती. आता नवी मोठी जबाबदारी आल्याने त्यांना जड अंतःकरणानेच तरुण भारतचा निरोप घ्यावा लागत आहे. आपली नवीन जबाबदारीही ते यशस्वीपणे पार पाडतील असा विश्वास व्यक्त करीत मी त्यांना शुभेच्छा देतो.

आता त्यांच्या जागी शैलेश पांडे याची नियुक्ती झाली आहे व त्यानुसार ते सोमवारी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. शैलेश पांडे हे तरुण भारतसाठी नवीन नाहीत आणि त्यांच्यासाठीही तरुण भारत नवीन नाही. आजही ते डिजिटल तरुण भारतचे संपादक म्हणून कार्य करीत आहेतच, पण आता मुद्रित दैनिक सांभाळण्याची मोठी जबाबदारी त्यांच्याकडे आली आहे. ती ते यशस्वीपणे सांभाळतील याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. कारण ते नागपूर, विदर्भाच्या मातीत मुरलेले पत्रकार आहेत. बराच काळ त्यांनी तरुण भारत आणि इतरही दैनिकांची जबाबदारी सांभाळली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे माध्यम सल्लागार म्हणूनही ते कार्यरत होते. शिवाय मराठी व हिंदीमधून त्यांची पुस्तके प्रकाशित झाल्यामुळे साहित्यिक म्हणूनही सर्वज्ञात आहेत. आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन कार्य करण्याची हातोटीही त्यांच्या ठायी आहे. बहुमुखी प्रतिभेचे धनी ही त्यांची ओळख आहे. पत्रकारितेसाठी आवश्यक असलेली अभ्यासू वृत्ती त्यांच्या लेखनातून नित्य अधोरेखित होत असते. त्यांच्या नेतृत्वाखाली तरुण भारत नक्कीच प्रगतीची नवीन शिखरे गाठील असा विश्वास व्यक्त करून मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो व शुभेच्छाही देतो.

**ल. त्र्यं. जोशी**/माजी मुख्य संपादक, तरुण भारत, नागपूर

### शाळा, कॉलेजमधील भयानक वास्तव

''मॅडम, अकरावीला ॲडमिशन करायची आहे.''

''ठीक आहे, कोणते विषय घ्यायचे आहेत तुला? फॉर्म भरून दे, फी भरून ॲडमिशन घे.'' ॲडमिशन काऊंटरवर बसलेल्या मॅडम म्हणाल्या.

''हो मॅडम, पण मला झीरो अटेण्डन्सवाली म्हणजे डमी ॲडमिशन घ्यायची आहे. तुमच्या कॉलेजमध्ये मिळेल नं?''

आजकाल सगळ्याच ठिकाणी नित्य घडून येणारा हा संवाद. ज्युनिअर कॉलेजमध्ये नोकरी करत असताना गेल्या काही वर्षांपासून जन्माला आलेला हा संवाद आता दरवर्षी जोमाने वाढीला लागलाय. शिक्षण क्षेत्रात गेली तीस वर्षे मी काम करीत आहे. इतक्या वर्षांत मी हे क्षेत्र फार जवळून बघितलंय. ज्या पद्धतीने मागील चार पाच वर्षांत शिक्षण क्षेत्र बदलतंय तसं पूर्वी कधीच नव्हतं आणि नसणार असं मला वाटतं.

पूर्वी बारावीनंतर मेडिकल, इंजिनीयरिंग किंवा कुठल्याही तत्सम ग्रॅज्युएशनसाठी कोणतीही स्पर्धा परीक्षा नसायची. बारावीच्या मार्कांच्या आधारेच सगळे प्रवेश होत असत. १९९८ नंतर मेडिकलच्या सीईटी परीक्षेला सुरुवात झाली. नंतर इंजिनीरिंगचे प्रवेश सुद्धा या परीक्षेतूनच व्हायला लागले. जरी प्रवेश परीक्षा आल्या तरी बारावी बोर्डाच्या मार्कांना महत्त्व होते. त्यामुळे प्रवेश परीक्षेसोबतच बोर्डाच्या परीक्षेकडेही विद्यार्थी लक्ष देत असत. त्यासाठी शाळा, कॉलेजमध्ये त्यांची नियमित उपस्थिती राहत असे. प्रायव्हेट ट्युशन्स लावून, शिवाय कॉलेजमध्ये रेगुलर क्लासेस करून मुलं ही तयारी योग्य पद्धतीने करत असत.

हळूहळू कोचिंग क्लासेसचा जमाना आला. एकाच छताखाली सगळे विषय शिकवण्याची पद्धत सुरू झाली. सुरुवातीला लोकांनी त्याला विशेष रिस्पॉन्स दिला नाही. कारण एका कोचिंगच्या सगळ्याच शिक्षकांचे शिकवणे चांगले राहत नसे. मग जो विषय समजत नाही तो विषय फक्त बाहेर लावून बाकीचे विषय कोचिंग क्लासमध्ये शिकण्याकडे कल वाढला. तरीही बरेच विद्यार्थी शाळा, कॉलेजात येत असत. वर्षभर होणाऱ्या सगळ्या परीक्षा, विविध उपक्रम यात भाग घेत असत.

२०१४-१५ नंतर परीक्षा, परीक्षांची पद्धत सुरू झाली. राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या या कठीण परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी मात्र हळूहळू खाजगी शिकवणीकडे पाठ फिरवणे सुरू केले. कोचिंग क्लासेसमध्ये सुरुवातीला चार पाच तास विद्यार्थ्यांना जावे लागे. तरी पण सगळेच विद्यार्थी काही या परीक्षा देत नसत. त्यामुळे काही विद्यार्थी सोडता बाकी विद्यार्थी कॉलेजमध्ये हजेरी लावत असत. मध्यंतरी या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठमोठ्या महानगरांमध्ये, नागपूर, पुणे, मुंबई, कोटा किंवा हैदराबादला नावाजलेल्या कोचिंगमध्ये मुलांना पाठवण्याची होड लागली. तिथे दिवसातले आठ आठ, दहा दहा तास मुलांना शिकवणे, प्रॅक्टिस करून घेणे सुरू असते. त्यात काही मुलं यशस्वीही होतात. पण काहींच्या बाबतीत अगदी निराशाही पदरी पडते. अशी ही मुलं मग स्थानिक शाळा, कॉलेजमध्ये नॉमिनल ॲडमिशन घेऊन ठेवत. आणि बोर्डाच्या परीक्षेच्या एक दीड महिना आधी येऊन प्रॅक्टिकल आणि लेखी परीक्षा देत असत. पण हे प्रमाण त्यावेळी बरेच अल्प असे.

कोरोनाची साथ आली. दोन वर्षे सगळे जण घरात बसले. साथीनंतर जेव्हा सगळे सुरू झाले तेव्हा मुलांना बाहेर पाठवण्यासोबतच शहरातल्याच कोचिंग क्लासेसमध्येही पाठवणे सुरू झाले. छोट्या शहरातील कोचिंग क्लासेस सुद्धा आता महानगरातील कोचिंगचं अनुकरण करायला लागलेय. स्पर्धेच्या या युगात प्रत्येकच पालक आपल्या पाल्याला या दौडीत भाग घ्यायला लावतोय. त्यासाठी कोचिंगवाले जे म्हणतील ते करण्याकडे कल वाढत चाललाय. या कोचिंग क्लासेसच्या चालकांनी आता मोठ्या शहरांच्या क्लासेस प्रमाणेच आठ दहा तास शिकवणे आणि मुलांना अभ्यासाच्या नावाखाली अडकवून ठेवणे सुरू केले. मग त्याचे पर्यवसान मुलांनी फक्त आणि फक्त कोचिंगच करावे यात होऊ लागले. अजूनही काही कोचिंग क्लासेस असे आहेत जे शाळा, कॉलेजच्या वेळाचे भान ठेवून आपल्या वेळा ठरवतात, त्यानुसार बॅचेस बनवतात. पण अशा क्लासेसचे प्रमाण अत्यल्प आहे.

या सगळ्या गोष्टींचा परिणाम म्हणजे आता मुलांनी शाळा, कॉलेज, खेळ मैदानाकडे पूर्णपणे पाठ फिरवलीय. कोचिंगचे चालक आता पालकांना सांगतील त्याच शाळा, कॉलेजमध्ये विद्यार्थी प्रवेश घेऊ लागले. जे शाळा, कॉलेज विद्यार्थ्यांनाही झीरो अटेण्डन्स आणि डमी ॲडमिशन देतील त्यांच्याकडेच ॲडमिशन घेण्याकरिता रांगा लागू लागल्या.

वरवर पाहता साधी वाटणारी ही गोष्ट जेव्हा कॉलेजची एक शिक्षिका म्हणून मी बघते तेव्हा मन हेलावून जातं. प्रत्येकच विद्यार्थी जर अशी डमी ॲडमिशन घेऊ लागला तर पुढे काय होणार? बऱ्याच लोकांना असं वाटतं की शाळा, कॉलेजमध्ये शिकवले जात नाही म्हणून मुलं बाहेर ट्युशन्स लावतात. पण सत्य परिस्थिती ही आहे की विद्यार्थी शाळेत आलेच नाहीत तर शिक्षक शिकवतील तरी कसे? विद्यार्थिसंख्या कमी झाली की शिक्षक कमी होणार, असलेल्या नोकऱ्या जाणार, शहरातील प्रायव्हेट शाळांचे हाल तर विचारूच नका, विद्यार्थ्यांशिवाय शाळा चालणार तरी कशा? प्रत्येकाने या भयानक वास्तवाची दाहकता ओळखण्याची गरज आहे.

**वीणा आचार्य**/९४२३१७५७१५

### ज्योतिष शास्त्राचे महत्त्व आणि दिव्यत्व

वेदस्य निर्मलम् चक्षु: ज्योति: शास्त्रम् कल्मक्षम विनैतदखिलम् मोतरमार्त कर्म न सिद्ध तस्माज्जीहतायेदम् ब्रह्मणा रचिता पुरा

- नारद संहिता

ज्योतिष हा शब्द संस्कृतमधील ज्योती: शब्दापासून झाला असून ज्यापासून तेज वा प्रकाश उत्पन्न होतो अशा सूर्यादी घटकांचे ते दिग्दर्शक नाम होय. सूर्यादी नक्षत्र स्वयंप्रकाशी असून जीवसृष्टीवर तसेच यच्चयावत सृष्टीवरही ते परिणाम करतात. या ताऱ्याभोवती फिरणारे ग्रहसुद्धा प्रकाशमान होतात व त्यांची चुंबकीय प्रावरणे अत्यंत शक्तिशाली असतात. त्यामुळे या सर्वच ग्रहगोलांचा मनुष्यमात्रावर होणारा परिणाम ज्या शास्त्राद्वारे अभ्यासला जातो, त्याचप्रमाणे हे ग्रह, तारे व त्यांचे उपग्रह यांचे स्वरूपाविषयी, गतीविषयी, कक्षेविषयी सर्वंकष अभ्यास ज्यामध्ये केला जातो, ते हे ज्योतिषशास्त्र होय.

आपल्या सूर्यमालिकेतील समस्त ग्रह हे भारतीयांना देव, देवतांइतकेच परम पूजनीय आहेत. ही बाब आमच्या

ब्रह्मा, मुरारिस्त्रिपुरांतकारी भानु: शशी भूमिसुतो बुधश्च गुरुश्च शुक्र: शनि राहुकेतव:, कुर्वंतु सर्वे मम सुप्रभातम् या प्रात:स्मरणीय श्लोकातून स्पष्ट होते. त्यामुळेच आमच्या मौंज, विवाह, वास्तुशांती इत्यादी पूजा विधींमध्ये तसेच यज्ञ वा हवन कार्यामध्ये, नवग्रहांचे आवाहन, पूजन, उपासना आवश्यक कर्तव्य समजले जाते. महर्षी व्यासांनी तर या नवग्रहांची स्तोत्रे रचली आहेत. मुद्गलपुराण, ब्रह्मांडपुराण, पद्मपुराण, रुद्रयामल ग्रंथ, श्रीमद्भागवतम् इत्यादी प्राचीन ग्रंथात ग्रहांची वर्णने केलेली आहेत. इतकेच काय, पण स्वतः भगवान श्रीकृष्णानेच गीतेमध्ये अशी स्पष्ट घोषणा केली आहे की,

आदित्यानामहं विष्णू ज्योतिषाम् रवीरंशुमान मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्रामहम् शशी

महर्षी पाराशरांनी तर आपल्या सुप्रसिद्ध बृहतपाराशर होराशास्त्रम् या ग्रंथात अवतारकथनाध्याय हे संपूर्ण प्रकरण, दैत्यांच्या संहाराकरिता, सज्जनांच्या व देवांच्या रक्षणाकरिता, तसेच धर्मसंस्थापनेसाठी झालेले परमेश्वराचे सर्व अवतार हे वेगवेगळ्या ग्रहांपासून कसे झाले आहेत, त्याचे सुरेख व सविस्तर विवेचन रामोवतार सूर्यस्थ चंद्रस्य यदुनायक: नृसिंहो भूमिपुत्रस्थ, बुध: सोम सुतस्य च इत्यादी श्लोकांद्वारे केलेले आहे.

सद्य:कालीन खगोलशास्त्र हे ज्योतिषशास्त्राचेच अपत्य आहे. ज्योतिष हा विषय मानवाला नेहमीच उत्कंठावर्धक राहिलेला आहे. पूर्ण जगभर अभ्यासले जाणारे हे शास्त्र भारतीयांच्या तर जणू रक्तातच भिनलेले आहे. ज्योतिषशास्त्र हे नेहमीच विद्वानांच्या चर्चेचा विषय राहिलेले, पीडित मनुष्याचा आधार बनलेले, त्रस्त जीवांना आशा निर्माण करणारे, बुद्धिमान मनुष्यासाठी आकर्षण उत्पन्न करणारे, सामान्यांची उत्सुकता ताणणारे, काळाच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या हतबल जीवांना संजीवनी प्रदान करणारे, ईश्वरभक्तांना परम मार्गदर्शक ठरणारे, असे हे ज्योतिषशास्त्र वेदांचे एक अंग आहे. याला वेदचक्षू असेही म्हणतात. वेदांच्या सहा अंगांपैकी ज्योतिष हे एक अंग असले तरी इतर अनेक शास्त्रांपेक्षा ज्योतिषशास्त्राचे महत्त्व फार जास्त आहे. ही महती ऋग्वेद ज्योतिषाच्या सातव्या खंडात फार सुरेख वर्णन केली गेली आहे.

शेवटी एवढेच म्हणावे वाटते की, हे शास्त्र म्हणजे परमतत्त्वाशी जवळीक असलेले रहस्य आहे. आणि हे रहस्य जो जाणतो त्याला सर्व पुरुषार्थ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची प्राप्ती होऊन तो जीवनाच्या आपल्या विशिष्ट क्षेत्रात यशस्वी तर होतोच, शिवाय आपले आयुष्य सुखा समाधानाने, आनंदाने समृद्ध करतो यात शंका नाही.

**मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

### देशात भेसळीचे वाढते प्रमाण चिंताजनक

नुकतेच सोशल मीडिया हाताळताना समाजाच्या दृष्टीने जागृती करणारा एक महत्त्वाचा व्हिडीओ दृष्टीस पडला. या व्हिडीओत दाखविलेल्या भेसळप्रमाणे देशात आज अन्नपदार्थांत केली जाणारी भेसळ किती मोठ्या प्रमाणात केली जात आहे आणि याचे दुष्परिणाम अगदी लहान मुलांसह सर्वांना भोगावे लागत आहे. भाषेवरून भारतातील उत्तर भागातील व्हिडिओ असावा असे प्रथमदर्शनीच जाणवत असलेल्या या व्हिडीओत एका टरबूज विक्रेत्यावर छापा घालून स्थानिक पोलिसांनी मोठी भेसळ उघडकीस आणली आहे. याबद्दल खरेच त्यांचे कौतुक करायला हवे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने बाजारात सर्वत्र टरबूज विक्रीसाठी आलेले आहेत. आरोग्याच्या दृष्टीने हितकारक असलेले टरबूज घेताना कुणीही ते आतून लाल असले की, पटकन घेतो. पण, हेच टरबूज आतून लाल दिसावे आणि गोड वाटावे म्हणून मानवी देहावर प्रतिकूल परिणाम करणारे विविध रसायने त्यात इंजेक्शनद्वारा आत सोडून विक्रीला पाठविण्यात येत होते. पोलिसांनी छापा मारून हा प्रकार निव्वळ उघडकीसच आणला नाही, तर त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करून सामान्य जनतेला जागृत करण्याचे काम केले आहे. यातील नोकर जरी ही भेसळ करत असला तरी आयुष वर्मा नावाचा व्यावसायिक हे सर्व करवतो आहे, याचा कबुलीजबाब त्याने दिलेला आहे.

मागे असाच एक व्हिडिओ भेसळयुक्त दुधापासून आईस्क्रीम तयार करणाऱ्या कंपनीच्या आतील घेऊन कुणीतरी तो व्हायरल केला होता. यात सुद्धा युरियापासून दूध तयार करून त्या दुधापासून आईस्क्रीम तयार करत असल्याचे संपूर्ण दृश्यांकन त्यात करण्यात आले होते. स्वतःच्या आर्थिक स्वार्थासाठी हे व्यावसायिक, विक्रेते का करतात अशी भेसळ? आज देशात या सर्व प्रकारावर लक्ष ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन नेमले गेले असले तरी, त्यांच्या निदर्शनास या सर्व बाबी येत नसाव्यात काय? असे एक ना अनेक प्रश्न आपल्याला हे असे भेसळ करणारे बघितले की पडतात. अन्नपदार्थांत केल्या जाणाऱ्या रसायन भेसळीमुळे कर्करोगासारख्या रोगांना निमंत्रण दिल्यासारखे आहे. अशाच एका प्रकरणी मागे राजस्थान उच्च न्यायालयाने चिंता व्यक्त करत स्वतःहून दखल घेतली होती. इतकेच नाही तर राज्य सरकारांनी यावर कठोर पाऊले उचलावी, कठोर कायदे करावे असे निर्देशच कोर्टाने दिले होते. केंद्रीय गृहमंत्रालय, आरोग्य, कृषी आणि अन्न पुरवठा, अन्न सुरक्षा प्राधिकरण यांच्यासह इतरांना सुद्धा नोटीस पाठवून यावर उत्तर मागविले होते. यावरून अन्न पदार्थातील भेसळ किती महत्त्वाचा प्रश्न आहे, हे लक्षात येते.

एप्रिल महिन्यातील ऐन सणासुदीच्या काळात नागपुरातील हुडकेश्वर भागातील नकली सोयाबीन तेल बनविणाऱ्या एका कंपनीवर धाड टाकून नागपूर गुन्हे शाखेने तब्बल आठ लाख रुपयांच्या मुद्देमाल जप्त केला. ब्रँडेड कंपनीच्या लेबलखाली याठिकाणी नकली तेल बनवून लोकांच्या आरोग्याशी खेळले जात होते. तर मागे लकडगंज पोलिसांनी मिळालेला माहितीच्या आधारे वासुदेव खंडवाणी याच्या बनावट खाद्य तेलाच्या गोदामावर धाड टाकून १ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला होता. मागच्या वर्षी जूनमध्ये सरकारने राजस्थानमध्ये १८ हजार लिटर बनावटी खाद्यतेल ताब्यात घेतले असल्याची माहिती भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने त्यांच्या संकेतस्थळावरून शेअर केली होती.

भेसळ होत असल्याचे आढळल्यास त्याची तक्रार नेमकी कोठे, कशी करायची याचीही माहिती व शिक्षण झाले पाहिजे. ही प्रक्रिया अत्यंत सोपी झाली पाहिजे. यामध्ये तक्रारकर्त्यांची ओळख गुप्त ठेवण्याबाबतही विचार झाला पाहिजे. त्यामुळे आसपास घडत असलेल्या भेसळीच्या तक्रारी करण्यासंदर्भातील सर्वसामान्याच्या मनातील भीती कमी होईल. निदान देशाची युवा पिढी सशक्त आणि सुदृढ असावी, यासाठी अशा भेसळखोरांवर योग्य कारवाई करण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' उपक्रमात सहभागी व्हा

## २२ एप्रिल, २०२५ ते १ मे, २०२५ या कालावधीत राज्यात विविध उपक्रम होणार

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.२० एप्रिल**

पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन म्हणजे दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन म्हणजे १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.


'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानता सहभागी व्हावे

श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण ववातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत. २२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायचे आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत , ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील याच्यामध्ये सहभाग घ्यावा. नदी – नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रीड्यूस, री युज आणि रिसायकल या त्रिसूत्रीचा प्रयोग करणाऱ्यांचा होणार सत्कार



त्यानंतर दि. २५, २६ आणि २७ एप्रिल या तीन दिवसांमध्ये विविध संघटना, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून रीड्यूस, री युज आणि रिसायकल या तत्त्वाप्रमाणे म्हणजे, आपण कुठल्याही चुकीच्या गोष्टींचा वापर कमी करणे म्हणजे रीड्यूस करणे, त्याचबरोबर कोणत्याही चांगल्या गोष्टी ज्या आपण परत परत वापरू शकतो त्यांचा रीयूज करणे आणि कुठल्याही गोष्टी जसे पाणी रिसायकल करतो आणि ते वापरतो त्यामुळे आपण वसुंधरेचा म्हणजे पृथ्वीचा फार मोठा फायदा त्याच्यामधून होतो आणि पर्यायी आपल्याला त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे या त्रिसूत्री चा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

श्रीमतीमुंडे म्हणाल्या की, रीड्यूस, री यूज आणि रिसायकल या तत्त्वावर कोणी जर अत्यंत चांगले प्रयोग केले असतील, तर या प्रयोगांचा सन्मान एक मे रोजी महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते त्या त्या जिल्ह्यामध्ये होईल. तसेच हे प्रयोग राज्य पातळीवर मागवून यांच्यामधले उपयुक्त प्रयोगाचे कौतुक करून त्यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच अश्या प्रयोगाचा उपयोग विविध योजनामध्ये करण्याचा विचार आहे, असेही त्यांनी सांगितले.

घोषवाक्य स्पर्धा घेऊन विजेत्यांना गौरविणार

दि . २८, २९ व ३० एप्रिल या तीन दिवसांमध्ये सर्वांनी पर्यावरण बचाव वसुंधरा सजाव या अभियानाच्या माध्यमातून घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यातील उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्यांचा सन्मान हा महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात येईल. तसेच या घोषवाक्याचा समावेश महाराष्ट्र दिनाच्या संचलनात देखील करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यामधून तीन असे घोषवाक्य घेऊन राज्यस्तरावर तीन उत्कृष्ट घोषवाक्य निवडण्यात येतील. याचा वापर महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या जाहिरातींमध्ये केला जाईल. उत्कृष्ट तीन घोषवाक्य करणाऱ्याचा राज्यस्तरावर सन्मान करण्यात येईल.

२२ एप्रिल ते १ मे या कालावधीत आयोजित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोकप्रतिनिधी तसेच सामान्य नागरिक यांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

# जयभिम महोत्सवात नृत्य स्पर्धा

## कलाकारांच्या कलागुणांना मिळाली संधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० एप्रिल**

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, जयभीम महोत्सवात नृत्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला होता.

बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या जयभिम महोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये नृत्य स्पर्धा उत्साहात पार पडली. यावेळी नृत्य स्पर्धा समितीचे प्रमुख तथा आयोजक अजय सवाई यांच्या उपस्थितीत सदरील स्पर्धा पार पडली. या नृत्य स्पर्धेला उदघाटक म्हणून




शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, प्रमुख पाहुणे प्रा. वसंत ओगले , समितीचे अध्यक्ष गौतम चोपडे, अरुणाताई आठवले , बबन भाऊ वडमारे, अशोक वीर ,गोटू वीर ,, अजय सरवदे, प्रमोद शिंदे, रवी वाघमारे, राजू महुवाले, प्रशांत ससाणे,मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड,अमरेंद्र विद्यागर , सचिन सोनवणे, राहुल कांबळे ,बंधू निसर्गंध, विशाल सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

# अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० एप्रिल**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटक दगडू दादा गायकवाड यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ, सूरज गायकवाड, अमित गायकवाड, शुभम आखाडे, संदेश सावंत, विशाल उबाळे, दामोदर डोळस, किशोर जाधव, भरत जाधव, सुमित जाधव, वसंत जाधव, प्रशांत दुधाळ, प्रितम दुधाळ, दिपक भराटे, महेश नेवडे, गोपाळ आखाडे, सुशील दुधाळ, औदुंबर दुधाळ, नितिन शेवाळे, दत्ता राऊत, विनोद गायकवाड, रवि दुधाळ, अविनाश कुऱ्हाडे, सोहेल गायकवाड, विनोद गायकवाड, तेजस नाळे, सोनू सुरवसे, अविष्कार दुधाळ, अनय गायकवाड, राम अंकुशे, सचिन अंकुशे, श्याम अंकुशे, प्रतिक दुधाळ, निवास रोकडे, संघर्ष डोंगरे, सौरभ राऊत, बबलू घुमरे,



अतुल जगताप, शैलेश आगलावे, दीपक बोबडे यांनी काल दि. १९ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोडबीड येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटक दगडू दादा गायकवाड यांनी प्रत्येकाच्या हाती भगवा झेंडा देऊन सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले.

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यशस्वीपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे. सर्वसामान्यांसाठी त्यांनी अनेक हितदायी योजना उभारल्या. बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असणारे आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांची ताकद वाढवण्याकरिता आपण सर्व जाती–धर्मातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे अशा भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात मांडल्या तर अठरा पगड जातीची वज्रमुठ एकनाजी शिंदे साहेबांची ताकद वाढविण्यासाठी कामी येणार असल्याचे मत शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटक दगडू दादा गायकवाड यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्हा लॅक्रोस टिम ने राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० एप्रिल**

नुकत्याच पुणे हडपसर येथील मैदानावर लेक्रॉस च्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र राज्य लेक्रॉस असोसिएशनचे सचिव डॉ.मोहम्मद बाबर , बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशनचे अध्यक्ष रामदास गिरी, माऊली ढवळे रोहित ढवळे महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी व खेळाडू यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन संपन्न झाले. लॅक्रोस हा खेळ २०२८ मध्ये ऑलम्पिक स्पोर्ट्स मध्ये खेळला जाणारा खेळ आहे. या लेक्रॉस च्या दुसऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण २५ संघाने सहभाग नोंदवला. जुनिअर गट अंडर १९ मुलींच्या बीड जिल्हा संघाने या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. विजयी संघातील खेळाडू जुनिअर गट मुली तनुजा हडुळे, सृती जाधव, गौरी नागपुरे, श्रावणी मुळे, सुहानी शिंदे, अदिती शिंदे, सिद्धी जाधव, अक्षता बंड, ज्ञानेश्वरी नागरगोजे या खेळाडूंना विशाल गिरी,अनंत जाधव ,रोहित ढवळे, संकेत वायकर, अमोल ढवळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. वरील खेळाडू पुढे आग्रा येथे




होणाऱ्या लॅक्रॉस राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, द.बा.घुबरे पब्लिक स्कूलचे सचिव दीपक ( दादा) घुंमरे ,ॲड. राजेंद्र बन क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक राठोड सर, जितू आराक सर, बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशन अध्यक्ष रामदास गिरी, अनंत जाधव , कल्याण माने,सचिव विशाल गिरी, माऊली ढवळे, रोहित ढवळे, अन्य प्रशिक्षक व पालकांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० एप्रिल**

१७–०४–२०२५ रोजी म.शि.प्र संचालित,यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे राबवत असलेल्या मेंटोर मेंट्टी उपक्रमाच्या अंतर्गत विद्यार्थी पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी बोलताना सांगितले की,विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती करण्यासाठी पालकांची काय भूमिका असली पाहिजे, विद्यार्थ्यांच्या समस्या, शिक्षणाचे महत्त्व, सध्या महाविद्यालय राबवत असलेले उपक्रम जसे की,औद्योगिक क्षेत्रात सध्या नवीन कोणते तंत्रज्ञान आहे त्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन व कंपन्यांना भेटी, व्यक्तिमत्व विकास इत्यादी उपक्रमाविषयी माहिती दिली व भविष्यकाळात राबवणार असलेले उपक्रम,तसेच महाविद्यालय जे प्रगती करत आहे त्याच्या मध्ये पालकांचा असलेला सहभाग इत्यादी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यानंतर प्रत्येक पालकांनी जो त्यांच्या पाल्याचा शिक्षकीय कर्मचारी मेंटोर आहे त्यांना भेटून आपल्या पाल्याची प्रगती,सराव परीक्षा मधील प्राप्त केलेले गुण, सत्रा मधील उपस्थिती, शैक्षणीक प्रगती इत्यादी विषयी चर्चा केली. मेळावा आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश (दादा) सोळंके, उपाध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव सतिश (भाऊ) चव्हाण, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी शैक्षणिक समन्वयक प्रा.मोमीन आय.एल, विभागप्रमुख प्रा.शेख एफ.जे, प्रा.नखाते एस.बी,प्रा. देशमुख जे. व्हि,प्रा.शिनगारे एस. टी,प्रा.नासरे एस. पी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम पार पडण्यासाठी प्रा.जगताप एम. यू,प्रा. मोरे डी.एन यांनी परिश्रम घेतले.

# बस प्रवासात दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**आष्टी दि.२० एप्रिल**


शहरातील बस स्टँड येथून प्रवास करत असताना अज्ञात चोरटयांनी पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याची घटना (दि. १३) रविवार रोजी ११ वाजता घडली असून चोरटयांनी १,०६,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आष्टी तालुक्यातील शिराळा येथील रंजना गणपत गायकवाड (वय ४५) यांचे मुलगा व मुलगी आष्टी बस स्टॅन्ड येथून पुणे बसने जात असताना अज्ञात चोरटयांनी पर्स मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १,०६,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना (दि.१३) रविवार रोजी घडली आहे. यात दीड तोळ्याची सोन्याची चैन अंदाजे किंमत ६०००० रुपये, पाच ग्रॅम सोन्याची अंगठी अंदाजे किंमत २२००० रुपये, तीन ग्रॅमचे कानातील फुले अंदाजे किंमत १०००० रुपये, सोन्याचे फुल अंदाजे किंमत ९००० रुपये व रोख रक्कम ५००० रुपये असा एकूण १,०६,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखण्याचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० एप्रिल**

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखता यावी यासाठी संस्थेच्या वतीने एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यामध्ये बीड आणि छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पत्येक्ष अन्न पदार्थांमधील भेसळ कशी ओळखावी यासाठी प्रात्यक्षिक करून दाखवले.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्येक विषयाचा बारीक अभ्यास व्हावा. त्यांना भविष्यात त्या विषयाचे ज्ञान आपल्या करिअरसाठी उपयुक्त व्हावे यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक



मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे नेहमीच प्रयत्न करत असतात. त्याचाच एक भाग म्हणून अन्न व औषध प्रशासन कार्यशाळा छ. संभाजीनगर अन्न व औषध प्रशासन बीड आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालय बीड यांच्याद्वारे अन्नपदार्थ मधील भेसळ कशी ओळखायची यांची जनजागृती मोहीम आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे आयोजन आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयात करण्यात आले होते.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून छत्रपती संभाजी नगरचे सतीश बादाडे, बीडचे पवन कुमार धूत, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शाम भुतडा तर व्यासपीठावर डॉ. कल्याण अपेट, डॉ. पी. डी. खेडकर, डॉ. डी. बी. सातपुते, डॉ. एन. यु. ठोके, प्रा. पी.आर. गव्हाणे,प्रा. व्ही. एस. मिसाळ, प्रा. के.पी. पवार, प्रा. ए.पी. धुमाळ, प्रा. एस. आर. सुधीर, प्रा. पी. एस. मोराळे यांची उपस्थिती होती. प्राचार्य शाम भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याण अपेट यांनी केले.

अन्न पदार्थांतील भेसळ ओळखणे अत्यंत आवश्यक

दैनंदिन वापरातील अन्न पदार्थांमध्ये विविध घटकांचा वापर करून भेसळ केली जाते. भेसळ करण्यासाठी अपायकारक पदार्थांचा वापर केला जातो. त्यामुळे अन्नपदार्थांचा दर्जा खालावतो. भेसळ करण्यासाठी सामान्यतः खडू भुकटी, कृत्रिम रंग, लहान–मोठे दगड, लाकडाचा भुस्सा इत्यादी घटकांचा वापर केला जातो. असे भेसळयुक्त पदार्थ खाण्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. त्यामुळे अन्न पदार्थांतील भेसळ ओळखणे अत्यंत आवश्यक असल्याचे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेले छत्रपती संभाजीनगरचे सतीश बादाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. यावेळी त्यांनी भेसळ ओळखण्याच्या पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

# केज येथे १ मे रोजी रोटरी क्लबच्या वतीने भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२० एप्रिल**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रोटरी क्लब ऑफ केज यांच्या वतीने केज शहर व तालुक्यातील कुशल व गुणी कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देण्याकरिता येत्या १ मे महाराष्ट्रदिन व कामगारदिनाचे चे औचित्य साधून केज शहरातील हनुमान मंदिर (वकिलवाडी) समोरील प्रांगणात सायंकाळी ठीक ६ वाजता भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत केज तालुक्यातील सर्व गुणी कलाकारांना आपली कला दाखवण्याची संधी दिली जाणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कलाकारांना २८ एप्रिल रोजी आपल्या डान्स ची रंगीत तालीम द्यावी लागेल. यामध्ये निवड होणाऱ्या कलाकारांनाच १ मे रोजीच्या स्पर्धेत संधी दिली जाईल. रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता भोसले ब्रिलिअन्स क्लासेस केज च्या हॉल मध्ये पार पडेल. ही स्पर्धा चौथी ते सातवी व आठवीच्या पुढे खुला गट अशी दोन गटात होणार आहे. भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व कलाकारांना आपली नावे व रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत देता येतील. त्यानंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही. इच्छुकांनी आपली नावे विद्यमान अध्यक्ष रो प्रकाश कामाजी (व्यंकटेश ज्वेलर्स, कानडी रोड – ९८६०६ ५२४५४) सचिव आनंद तरकसबंद (सहशिक्षक– ९४०४६ ९७४७५, ०८६–६८४–४७७४४ ), संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले (९४२३७३३८८८), प्रोजेक्ट चेअरमन रो श्रीराम देशमुख (सहशिक्षक– ९०७५७ ५४४४४) यांचेकडे नोंदणी करावीत.

# वैशाख पौर्णिमा व बुद्ध जयंती निमित्त दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन – भदंत पय्यातीस महाथेरो

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ**
**दि.२० एप्रिल**

तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्त तसेच वैशाख पौर्णिमे निमित्ताने २ मे पासून जवळा फकीर येथे दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भदंत पय्यातीस महाथेरो यांनी दिली.



अखिल विश्वाला शांतीचा आणि समतेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीच्या निमित्ताने मृगदायवन महाविहार, धम्म प्रशिक्षण संस्था, सारनाथ पार्क, जवळा फकीर येथे शुक्रवार दिनांक २ मे ते सोमवार १२ मे २०२५ पर्यंत मौजे जवळा येथे भव्य श्रामनेर शिबिर आयोजित करण्यात आले आहे. लहान मुलावर संस्कार होण्याकरिता या शिबिरात जास्तीत जास्त मुलांनी नाव नोंदणी करावी.या शिबिरात भदंत मुदितानंद थेरो परभणी यांचे प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. नाव नोंदणीसाठी तसेच या दहा दिवसांच्या कालावधीत ज्या उपासक, उपासिका यांना नाष्टा,भोजनदान व अल्पोपहार ,दान, द्यायचे आहे त्यांनी मो. ९५२७७८८३५८ ,९०९६७८७१४१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# गुणवत्ता विकास हेच शिक्षकांचे ध्येय असावे : भालके



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** विद्यार्थ्यांचा सर्वंकष व सातत्यपूर्ण गुणवत्ता विकास हेच जिल्हा परिषद शिक्षकांचे ध्येय असावे, असे प्रतिपादन लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांनी येथे केले.

बोरी (ता. लातूर) येथील जिल्हा परिषद प्रशालेत गुरूवारी आयोजिलेल्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोरीच्या सरपंच विजयमाला शिंदे, उपसरपंच शंकर पाटील, ग्रामविकास अधिकारी प्रशांत रेड्डी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमाकांत मलवाडे, ग्रामपंचायत सदस्य शालिक थोरमोटे, केशव भालके, बालाजी बालणे यांची उपस्थिती होती. प्रशालेच्या समोरील मैदानावर क्रीडांगण विकसित केले. याचे उद्घाटन गटविकास अधिकारी भालके यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापिका अंदुरकर, मिलिंद कांबळे, दैठणकर, सोनटक्के, छाया सोलापूरे, शंकर सुडे, श्रीमती भालके यांनी गटविकास अधिकारी भालके यांचा सत्कार केला. प्रशालेच्या राष्ट्रीयस्तरापर्यंत गेलेल्या खेळाडू तेजस्विनी बालणे, वेदिका मलवाडे यांचा सत्कार केला. जि. प. प्रशालेच्या गुणवत्तेबद्दल गटविकास अधिकारी भालके यांनी समाधान व्यक्त केले.



## संक्षिप्त वृत्त...

### 'अंनिस'च्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. सोमनाथ रोडेंची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचा लातूर जिल्हा प्रेरणा मेळावा ज्येष्ठ कार्यकर्ते व राष्ट्रपती पारितोषिक विजेते शिक्षक विश्वनाथ मुडपे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी 'अंनिस'च्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. सोमनाथ रोडे यांची निवड करण्यात आली.



या मेळाव्यात निरीक्षक म्हणून राज्य सरचिटणीस विनायक सावळे व रुक्साना मुल्ला उपस्थित होते. मंचावर राज्य कार्यवाहक हरिदास तम्मेवार, उत्तरेश्वर बिराजदार, बाबा हलकुडे, दिलीप अरळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. बीज भाषणात राज्य सरचिटणीस सावळे म्हणाले, सामाजिक संघटनेची यशस्वीता ही संघटनेचे विचार, ध्येय, प्रभावी नेतृत्त्व, कार्यकर्त्यांची एकजूट, संवाद व संपर्क, नियोजन, शिस्त व जबाबदारी आदी बाबींवर अवलंबून असते. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

### आ. अमित देशमुख यांच्याकडून बनसोडे कुटुंबियांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांचे नुकतेच निधन झाले. आ. अमित देशमुख यांनी सायंकाळी लातूर तालुक्यातील गंगापूर येथे जाऊन दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला.



यावेळी सुमित दत्तात्रय बनसोडे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन रवींद्र काळे, चंद्रशेखर दंडीमे, डॉ.सतीश कानडे, तानाजी फुटाणे आदी उपस्थित होते.

### राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** राष्ट्रवादी युवक काँग्रेसने अजित पर्व युवा जोडो अभियाना अंतर्गत युवक मेळाव्याचे आयोजन केले होते. युवकांशी थेट संवाद साधता यावा म्हणून हा मेळावा आयोजिला होता.

मेळाव्यास माजी मंत्री आ. संजय बनसोडे, आ. विक्रम काळे, युवकचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, शहराध्यक्ष मकरंद सावे, नांदेड शहराध्यक्ष जीवन घोगरे, प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. व्यंकट बेद्रे, माजी नगरसेवक नवनाथ आल्टे, युवकचे शहराध्यक्ष लाला सुरवसे, युवक प्रदेश उपाध्यक्ष इरशाद सय्यद, सरचिटणीस अमर पाटील, विशाल आवाडे, अभिजित सगरे, प्रवीण पाटील, अनिल नल्ले, कबीर शेख, मयुर जाधव, खमर काझी, सचिन चव्हाण, किशोर सवंडकर, राजकिरण सूर्यवंशी, सोहम गायकवाड, प्रवीण थोरात, जहाँगीर शेख, राजेश खटके उपस्थित होते.

### कारची स्कूटीला धडक; एक जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** अंबुलगा येथे जात असताना तगरखेडा येथे भरधाव वेगातील एमएच ०३ बीजे १२१५ या क्रमांकाच्या कारने एमएच २४ बीसी ९०३५ या क्रमांकाच्या स्कुटीला जोराची धडक दिली.

निष्काळजीपणे भरधाव वेगात कार चालून स्कूटीला पाठीमागून धडेक दिल्याने स्कूटीवरील एक जण जखमी झाले, तसेच स्कुटीचे २५ हजारांचे नुकसान झाले, असे दीपक सूर्यवंशी यांनी औराद शहाजानी पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# मुख्यमंत्री, मंत्र्यांनी राज ठाकरेंच्या घरी जाणे टाळावे : मंत्री आठवले



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** उठसूठ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, इतर मंत्री हे राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जातात हे थांबले पाहिजे. त्यांनी तसे जाऊ नये, असे आवाहन करत हिंदी विषय शालेय अभ्यासक्रमात सक्तीचा हा निर्णय योग्यच असल्याची भूमिका केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी शनिवारी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना मांडली.

यावेळी मंत्री आठवले म्हणाले, सामाजिक न्याय या खात्या अंतर्गत अनेक कामे करता येतात. हे माझ्या समाजाच्या विकासासाठीचे आवश्यक असे खाते आहे.

मी आवडीने तिसऱ्यांदा हेच खाते मागून घेतले. २०२९ ला लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतरही मोदी हेच पंतप्रधान होतील व त्यावेळी मला हेच खाते मिळेल, असा विश्वास आठवले यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना व्यक्त केला. एवढेच नव्हे तर नरेंद्र मोदी हे २०३४ पर्यंत पंतप्रधान असतील, असाही दावाही त्यांनी केला. यावेळी राज ठाकरे यांच्या शालेय अभ्यासक्रमात पहिलीपासून हिंदी विषय सक्तीच्या शासनाच्या धोरणास विरोध करण्याच्या भूमिकेविषयी आठवले यांना विचारले असता, राज ठाकरे यांची ही भूमिका मुंबईचे अर्थकारण नष्ट करण्याची आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. उठसूठ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, इतर मंत्री हे राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जातात, हे थांबले पाहिजे.

त्यांनी तसे जाऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. हिंदी विषय शालेय अभ्यासक्रमात सक्तीचा हा निर्णय योग्यच असल्याची भूमिका त्यांनी मांडली. रिपाइं हा पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष आहे. हा पक्ष कधीही मी अन्य पक्षात विलीन करणार नाही, हा पक्ष मी पुढे चालवीत राहीन, उलट प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडी बरखास्त करून रिपाइंचे अध्यक्ष व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.



# महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या वतीने महिला वकीलाच्या मारहाणीचा तीव्र निषेध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या वतीने अंबाजोगाई येथील एका महिला वकील भगिनीला करण्यात आलेल्या अमानुष मारहाणीचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा अ‍ॅड. जयश्रीताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हा न्यायालयाच्या महिला विधिज्ञ कक्षात शनिवारी महिला विधिज्ञांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आपले मनोगत व्यक्त करताना अ‍ॅड. जयश्रीताई पाटील यांनी हा हल्ला केवळ एका वकील भगिनीवरील हल्ला नसून संपूर्ण स्त्री शक्तीवरील हल्ला आहे. महिला वकिलावर हल्ला करणे म्हणजे कायद्यावरच हल्ला करण्यासारखा प्रकार आहे. या प्रकरणातील दोषींवर गुन्हे दाखल करण्यात येऊन त्यांना कठोर शासन झाले पाहिजे.

अशा प्रकारचे भ्याड कृत्य यापुढे कोणाच्याही हातून होणार नाही, याकरिता दोषींवर कायदेशीर होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित महिला विधिज्ञांनी महिला विधिज्ञ भगिनीस करण्यात आलेल्या भ्याड मारहाणीचा तीव्र शब्दात निषेध केला.

याप्रसंगी अ‍ॅड. सुप्रिया मुथापू, अ‍ॅड. अरुणा वाघमारे, अ‍ॅड. अभिलाषा गवारे, अ‍ॅड. मनिषा दिवे, अ‍ॅड. पल्लवी कुलकर्णी, अ‍ॅड. तृप्ती इटकरी , अ‍ॅड. किरण चिंते, अ‍ॅड. छाया माळवदे , अ‍ॅड. वसुधा नाळापूरे, अ‍ॅड. अंजली जोशी, अ‍ॅड. प्रतिभा शेळके, अ‍ॅड. बिना राऊत, अ‍ॅड. गायत्री नल्ले, अ‍ॅड. वीणा पाठक ,अ‍ॅड. सपना बोरा, अ‍ॅड. कांचन वाघन्ना, अ‍ॅड. कीर्ती जाधव, अ‍ॅड. मीरा कुलकर्णी, अ‍ॅड. सुरेखा जानते , अ‍ॅड. सुनंदा इंगळे आदिंची उपस्थिती होती.

# ट्रॅक्टर, बुलेट चोरणारे अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** ट्रॅक्टरसह ट्रॉली व बुलेट मोटारसायकल चोरणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावून लातूर येथे गुरुवारी मोठ्या शिताफीने पकडले. त्यांच्याकडून दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. यात निष्पन्न झालेला तिसरा आरोपी फरार आहे.

पोलिसांनी ट्रॅक्टर, ट्रॉली व चोरलेली बुलेट असा एकूण ५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींना वाढवणा पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

चोरीच्या मुद्देमालाचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात विविध विविध पथके तयार करण्यात आली आहेत. त्याअनुषंगाने पथक माहितीचे संकलन करीत होते. गुरुवारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली. उदगीर तालुक्यातील वाढवणा पोलीस व औसा पोलिसांच्या हद्दीतून ट्रॅक्टर व ट्रॉली चोरणारे लातूरमध्ये येणार असल्याचे समजले. यामुळे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सापळा लावून छत्रपती संभाजी महाराज चौकात जाऊन थांबले. पोलिसांनी आरोपी येताच त्यांना घेरले. ताब्यात घेण्यात आले. त्यात रामदास बाबुराव जाधव

(रा. कांबळगा ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर) व विठ्ठल लक्ष्मण शेळके (वय १९, रा. समता नगर, उदगीर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना ट्रॅक्टर व ट्रॉलीबाबत विचारपूस केली असता ते दोघे व त्यांच्यासोबत आणखी एक साथीदार योगेश राजेंद्र किरवले (रा. येळी, ता. औसा, फरार) असे मिळून फवारणी मशीन बसवलेले ट्रॅक्टर वाढवणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तर औसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ट्रॉली चोरल्याचे सांगितले. तो ट्रॅक्टर व ट्रॉली धाराशिव जिल्ह्यातील तावरजखेडा येथे एका शेतकऱ्याच्या आखाड्यावर ठेवल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्याकडील बुलेटची चौकशी केली असता ती फरार असलेल्या आरोपी योगेश किरवले याने कुठून तरी चोरून आणल्याचे त्यांनी सांगितले. त्यावरून आरोपींकडून ट्रॅक्टर, ट्रॉली व एक बुलेट मोटारसायकल असा ५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# 'राजमाता जिजामाता'चे जेईई मेन्स परीक्षेत नेत्रदीपक यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्यावतीने (एनटीए) घेण्यात आलेल्या जेईई मेन्स सेशन-२ परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत येथील राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखत नेत्रदीपक यश मिळविले.

आशिष आनंद बिरादार हा ९७.४१ टक्के गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम, निशा शिवाजी मोरे ही ९३.३१ टक्के गुण मिळवत द्वितीय तर हर्षवर्धन विनोद बद्दे हा ९० टक्के गुण मिळवत या महाविद्यालयात तृतीय आला आहे. अनिकेत अशोक मस्के याने ८९.४१ टक्के, करण माधव शिंदे ८५, यश प्रकाश गायकवाड ८४, इशान शैलेश आष्टेकर ८३, जयप्रकाश चेवले ७९.०१, सृष्टी दिनकर मुळे ७८, समृध्दी बाबासाहेब पाटील ७२, प्रणव जीवनराव गरड ७१, ईश्वरी शरद पांढरे ७०, सार्थक सतीश शेळके ७० व समिक्षा दत्ता गरड हिने ७० टक्के गुण मिळवले. तसेच महाविद्यालयातील अन्य विद्यार्थ्यांनीही या परीक्षेत यश मिळविले आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. डी. ए. फंड, प्रा. वैशाली पाटील यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# 'माझं घर'च्या विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** लातूरच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका तथा सामाजिक कार्यकर्ते अनिल पुरी यांच्या मातोश्री प्रा. कलावती गिरी-पुरी यांच्या पासष्टीनिमित्त शुक्रवारी सायंकाळी दयानंद सांस्कृतिक सभागृहात आयोजित कार्यक्रमात 'माझं घर' या सामाजिक संस्थेतील ६५ गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, माजी कुलगुरू डॉ. मधुकर गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अ‍ॅड. व्यंकट बेद्रे, लातूर नाट्य परिषदेचे अध्यक्ष अ‍ॅड. शैलेश गोजमगुंडे, 'आरसीसी'चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, उद्योजक तुकाराम पाटील, लायन्स क्लबचे अध्यक्ष नागनाथ गित्ते, प्रा. डॉ. भीमाशंकर पाटील, भैय्या भारती, शिवाजीनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, गुरुदत्त पुरी, 'माझं घर' प्रकल्पाचे संचालक शरद झरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लातूर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

# राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त येथील जिल्हा क्रीडा संकुलावर आयोजित राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत शुक्रवारी रात्री मुलींमध्ये लातूर विरुध्द नागपूर या संघांत झालेल्या अंतिम सामन्यात लातूरच्या संघाने नागपूरच्या संघावर ३-२ ने विजय मिळवला तर मुलांमध्ये नागपूर विरुध्द पुणे संघांत झालेल्या अंतिम सामन्यात पुण्याच्या संघाने नागपूरच्या संघाचा ३-१ ने पराभव केला.


अत्यंत दिमाखदार कार्यक्रमात राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार धीरज देशमुख यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.




गेली तीन दिवस जिल्हा क्रीडा संकुलावर व्हॉलीबॉलचे राज्यस्तरीय सामने सुरू होते. या स्पर्धेत मुलांचे आठ तर मुलींचे आठ असे एकूण १६ संघ राज्यभरातून सहभागी झाले होते. मुलींमध्ये लातूर विरुध्द नागपूर यांच्यात अंतिम सामना झाला. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात लातूरच्या मुलींनी चांगला खेळ करून विजेतेपद पटकावले. लातूरच्या संघास ७५ हजार रुपये, ट्रॉफी देण्यात आली. उपविजेता नागपूरच्या संघास ५१ हजार रुपये ट्रॉफी देण्यात आली. मुलांमध्ये नागपूर विरुध्द पुणे यांच्यात अंतिम सामना झाला. हा सामना अत्यंत रंगतदार झाला.

पुण्याच्या संघाने नागपूरच्या संघावर ३-१ ने विजय मिळवला. पुण्याच्या संघास ७५ हजार रुपये, ट्रॉफी तर नागपूरच्या संघास ५१ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. या स्पर्धेत मुलांमध्ये मुंबई उपनगर तर मुलींमध्ये पुणे हे दोन संघ तृतीय क्रमांकावर राहिले. या दोन्ही संघांना ३१ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली.

यावेळी सामना निरीक्षक आसिफ मुल्ला व उत्कृष्ट समालोचक प्रसाद कुलकर्णी यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पाहुण्यांचे स्वागत लातूर जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मोईज शेख, रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, धनराज देशमुख, अनंत देशमुख यांनी केले. प्रारंभी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रमितेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



# दयानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल -** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एम.कॉम. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने, प्रोफेसर डॉ.ब्रिजमोहन दायमा, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.मनिषा अष्टेकर, यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालय आणि प्राध्यापक यांच्याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.मान्नीकर म्हणाले, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने अनेक विद्यार्थी घडविले आहेत. वाणिज्य शाखेतून पदवी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. प्रा.डॉ. कविता बियाणी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी सुलक्षणा जगताप आणि अश्विनी कांबळे यांनी तर शेवटी आभार डॉ.मनिषा अष्टेकर यांनी मानले.

# विद्युत तारेच्या स्पर्शाने दोन जणांचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि.२० एप्रिल-**

विद्युत तारेच्या स्पर्शाने दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना हदगांव तालुक्यातील बोरगाव (हस्तरा) येथे घडली आहे.

हदगाव तालुक्यातील बोरगाव येथे दोन विवाह सोहळे होते. या लग्न सोहळ्याची गावात तयारी सुरू होती. लग्न सोहळा असल्याने गावातील तरुण मदतीसाठी आले होते. यातच गावातील युवक मंडप टाकण्याचे काम करत विद्युत तारांना स्पर्श झाल्याने हा अनर्थ घडला. मंडप उभारणी करत असताना मंडपाच्या वरून जाणाऱ्या विद्युत तारेला अनावधानाने स्पर्श झाला. यामुळे विजेचा जोरदार झटका बसून सख्खे चुलत भाऊ असलेले पांडुरंग भट्टेवाड व साईनाथ भट्टेवाड यांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला. जखमीला लागलीच रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेने हदगाव तालुक्यातील बोरगाव वर शोककळा पसरली.




**महावितरणवर गुन्हा दाखल करण्याची मागणी**


दरम्यान विद्युत तारा लोंबकाळत असल्याने गावातील रहिवाशांनी अनेक वेळा महावितरण कंपनीकडे तक्रार केली होती. परंतु महावितरणने याकडे दुर्लक्ष केले असल्याने ही घटना घडल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. संबंधित महावितरण कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका गावकऱ्यांनी घेतली.

# गोदावरी खो-यातील वाहून जाणारे पाणी नदीजोड प्रकल्पांतर्गत अडवून सिंचन क्षमता पूर्णत्वाने चालू करावी : माजी आ. ईश्वरराव भोसीकर

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि.२० एप्रिल-**

आमदार असतांना माझ्या काळात अपार मानार घरण १९८३ साली मंजूर करण्यात आले त्यावेळी सिंचन क्षमता ९००० हेक्टर होती नंतर अहमदपूर उपसा सिंचनाद्वारे व इतर साठवण तलावाचे नावाखाली १ टी.एम. सी. पाणी पुरवठा करण्यास मान्यता दिली .आता लोहा-कंधार तालुक्यातील सिंचन क्षमता ९००० हेक्टरहून ३००० हेक्टरने कमी होऊन उर्वरीत ६००० हेक्टरला सुध्दा पाणी मिळत नाही. त्यामुळे लोहा व कंधार गोदावरी खो-यातील वाहून जाणारे पाणी नदीजोड प्रकल्पा अंतर्गत अडवून सिंचन क्षमता पूर्णत्वाने चालू करावी असे प्रतिपादन माजी आमदार ईश्वरराव भोसीकर यांनी पत्रकारांशी आयोजित संवाद कार्यक्रमात कंधार येथे केले.

दि .१८ एप्रिल रोजी माजी आमदार ईश्वरराव भोसीकर यांच्या कंधार येथील निवासस्थानी पत्रकार परिषद चे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते पत्रकारांशी संवाद साधताना पुढे म्हणाले की सिंचन क्षमता ९ हजाराहून कमी होण्यामागे खालील प्रमाणे कारणे आहेत . त्यापैकी पिण्याचे पाणी - अहमदपूर, कंधार, लोहा नगरपरीषद मार्फत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सदरील शहरांना चालू आहे. लोहा येथे पाणी पुरवठ्यासाठी सुनेगांव तलावात त्याच बरोबर परीसरात ५ गावांना याच धरणातून पाणी मिळते. पालम तालुक्यातील दक्षिण भागातील बनवस पासून पेठशिवणी व इतर जवळपास ६५ गावांना पाणी पुरवठा योजना मंजूर होऊन सुरुवात झाली आहे. पालमला डिग्रस बंधा-यातून पणी घेता आले असते पण ती योजनासुध्दा अप्पर मानार पासूनच केली आहे. त्यामुळे २५ टक्के सिंचन क्षेत्र कमी झाले आहे. नव्याने प्रस्तावित योजना अंतेश्वर ते रुद्धा-झरी अशी मा.बाबासाहेब यांनी मा. मुख्यमंत्री व संबंधित खात्याकडे मागणी केत्री आहे व ती ही मंजूर झाल्याचे समजते. त्यामुळे अंतेश्वर ते झरी या गावाचा पाणी पुरवठा तसेच अप्पर मानारमध्ये पाणी सोडावे . दि . ०५/०८/२०२४ रोजी नदीजोड प्रकल्पा अंतर्गत गोदावरी खो-यातील अंतेश्वर येथून पावसाचे वाहून जाणारे पाणी अप्पर मानार धरणात सोडल्यास लोहा - माळाकोळी-माळेगाव व इतर गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल व कंधार-लोहा अंतर्गत



सिंचन क्षमताही वाढेल .याबाबत संबंधीत खात्याचे मंत्री, जिल्हाधिकारी व संबंधित खाते योजना दि. २०/०९/२०२४ रोजी निवेदनाचे पत्र दिले आहे.

गोदावरी नदीवर मराठवाड्यात फक्त जायकवाडी हे एकच धरण झालेले आहे व अनेक बंधारे आहेत. त्यामुळे पावसाळ्यात हे धरण व बंधारे भरून तसेच तेलंगाणातील पोचंप्पाड धरण भरूनसुध्दा सदरील पावसाचे पाणी हे वाहून जाऊन सागरास मिळत आहे पाटबंधारे खात्याचे सर्व्हे नुसार ५.५० टी. एम.सी. पाणी नदीजोड प्रकल्पाह प्रकल्पाद्वारे वापरता येईल असे समजते . नदीजोड प्रकल्पा अंतर्गत सदरील वाहून जावारे पाणी उर्ध्व मानार धरणात सोडल्यास अप्पर मानार व लोअर मानार धरणा अंतर्गत येणारे सिंचन क्षेत्र कायम राहील . लोअर मानार प्रकल्पातून उद्गीर-जळकोट तालुक्यातील अंदाजे २६ गावांना पाणी पुरवठा योजना मंजूर झाली आहे. या व इतर योजना सतत पिण्याचे पाण्याचे नावाखाली मंजूर होत असल्यामुळे सिंचन क्षमता कमी होत आहे. त्यामुळे कंधार, व लोहा धरणाच्या लाभक्षेत्रातील जमिनीला पाणी मिळणार नाही व धरण कोरडे पडेल अशी भिती निर्माण झाली आहे . कंधार व लोहा तालुक्यातील राजकीय पक्षाच्या प्रमुखांनी, पदाधिका-यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन सदरील दोन्हीही धोरणातील पाणी साठा वाढवण्यासाठी गोदावरी खो-यातील वाहून जाणारे पाणी नदीजोड प्रकल्पा अंतर्गत सोडण्यासाठी प्रयत्न करावा अशी अपेक्षा आहे. राजकीय मुद्या करून आप-आपसात मनभेद फरून घेऊ नयेत्र असे मला वाटते असे ते शेवटी म्हणाले .या पत्रकार परिषदेला उपस्थित कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर,माजी नगरसेवक शहाजी नळगे माजी उपनगराध्यक्ष सुधाकरराव कांबळे तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष डॉ.राजेश गुट्टे शहर काँग्रेस अध्यक्ष हमीदभाई सुलेमान,युवक काँग्रेस शहराध्यक्ष अजय मोरे विधानसभा सो.मी प्रमुख सतिश देवकत्ते

## संक्षिप्त वृत्त

### हिमायतनगरला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बैठक

**हिमायतनगर** -हिमायतनगर येथील महात्मा फूले सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ( अजितदादा गट) महत्वपूर्ण बैठक नूकतीच संपन्न झाली. या बैठकीत जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावनगांवकर यांनी पक्षवाढी संदर्भात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना रावनगांवकर म्हणाले की, गाव तिथं राष्ट्रवादी व व घर तिथे कार्यकर्ता निर्माण झाला पाहिजे. त्याचबरोबर एका बुथवर किमान १०० सभासद नोंदणी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम करावे, आगामी काळात होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षांचे उमेदवार निवडून आणण्यासाठी आपण सर्वांनी एक दिलांने काम करावे.असे आवाहन बाळासाहेब पाटील रावनगांवकर यांनी केले. या प्रसंगी संविधान वाचन करण्यात आले.व तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून बनविण्यात आलेल्या भारतीय संविधानाचे स्टीकर ज्यामध्ये भारतीय संविधान व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा फोटो आहे. व तसेच आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पाईक या पत्रकाचे विमोचन श्री रावनगांवकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालूकाअध्यक्ष अभिषेक लूटे यांनी केले. प्रास्ताविकांत लूटे म्हणाले की, जिल्ह्याचे नेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर व जिल्हाध्यक्ष रावनगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली अजितदादा पवार व पक्षांची विचारधारा घराघरांत पोहोचविण्याचे काम आपण प्रामाणिकपणे करीत राहणार असल्याचे अभिषेक लूटे यांनी सांगितले. यावेळी युवा जिल्हाध्यक्ष स्वप्नील पाटील इंगळे, माजी सभापती सुरेश बिल्लेवाड, जिल्हा चिटणीस प्रविण घूले, शिवाजी पाटील लगळूदकर, परसराम पाटील, आनंदराव ढवळे, सखाराम वाघमारे, एकनाथ पाटील, सुमित भरणे,पवन डोंगरे, दिगंबर नाईक आदिंसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठ्याप्रमाणात उपस्थिती होती.

### पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड दौरा

**नांदेड** -राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे सोमवार २१ एप्रिल २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. सोमवार २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६ वा. छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने नांदेडकडे प्रयाण. सकाळी १० वा. शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन व राखीव. दुपारी ३.४५ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून श्री. गुरू गोविंदसिंगजी विमानतळ नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सायं. ४.१० वा. श्री गुरु गोविंदसिंगजी विमानतळ नांदेड येथे आगमन व राखीव. सायं. ५.१० वा. श्री. गुरु गोविंदसिंगजी विमानतळ येथून विमानाने पुणेकडे प्रयाण करतील.

### ज्योती इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**नरसी** - तालुक्यातील नरसी येथील ज्योती इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नुकताच सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून ज्योती



इंग्लिश मीडियम शाळेचे अध्यक्ष तथा नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती सय्यद रहीम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी श्रीधर जगताप, सरपंच गजानन भिलवंडे, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, बाबुराव पाटील शिंदे होटाळकर, पत्रकार गंगाधर भिलवंडे, गोविंद टोकलवाड, गंगाधर गंगासागरे, होटलपा अप्पा, उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशाच्या गीतांने झाली यावेळी पारंपारिक नृत्य, देशभक्तीपर गीते, नाटिका लोकगीते यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी गावातील महिला , पुरुष, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सय्यद एम.आर., ईंगोले जि.यु, बंडगर एस.जी, चिखले एस.एन., कदम टि.जी., मुंडकर संभाजी , जावेद सर, कल्याणकर सर शेख अफरोज ,चव्हाण मॅडम या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### तांड्याचे पाय' ,कथासंग्रहास साहित्य ज्योती काव्यमंच बीडचा उत्कृष्ट कथा पुरस्कार

**मुक्रमाबाद**-अनिता जाधव लिखित कथा संग्रह ,तांड्याचे पाय, यास बीड जिल्ह्यातील कडा येथील साहित्य ज्योती काव्यमंच या संस्थेच्या वतीने देण्यात येणारे कथा पुरस्कार जाहीर झाले आहे .गेल्या तीन वर्षाचे विविध साहित्य प्रकारातील पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले आहेत. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष व मुख्य संयोजक नागेश शेलार यांनी दिली. महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रात मान्यता प्राप्त या संस्थेच्या वतीने सातत्याने मराठीतील दर्जेदार कलाकृतींना विविध साहित्य क्षेत्रातील पुरस्कार दिले जातात. काही अपरिहार्य कारणामुळे सन २०२२, २०२३ व २०२४ या पुरस्कारांची निवड करण्याची राहून गेली होती .ती नुकतीच संस्थेच्या वतीने जाहिर करण्यात आली . कथा लेखिका अनिता जाधव यांच्या तांड्याचे पाय , या कथासंग्रहाची २०२३ साठी निवड करण्यात आली आहे. रोख रक्कम शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## क्रीडा संकुलाची जमीन हस्तांतरित करावी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० एप्रिल-**

महाराष्ट्र भरात सर्वात जास्त तालुके असलेला जिल्हा म्हणजे नांदेड, शहरात हक्काचे एकही मैदान उपलब्ध नाही त्यामुळे खेळाडू विविध खेळापासून वंचित आहेत करिता पंचवीस एकर जागा जिल्हा क्रीडा संकुलासाठी देण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई स्तरावर प्रलंबित आहे तो प्रस्ताव त्वरित मार्गी लावून ती २५ एकर जमीन त्वरित जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे हस्तांतरित करावी अन्यथा २५ एप्रिल पासून नांदेड ऑलिम्पिक असोसिएशन व एक विद क्रीडा संघटनाच्या माध्यमातून उपोषण करण्याचा इशारा संघटना सचिव बालाजी पाटील जोगदंड व कोषाध्यक्ष प्राध्यापक जयपाल रेड्डी बंटी सोनसळे गोविंद पांचाळ यांनी दिला आहे.

# माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार व माजी नगरसेवकांचे शहरातील पाणी टंचाईकडे विशेष लक्ष

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० एप्रिल-**

नगर परिषदेच्या निवडणुका वर्ष २०१७ या वर्षी झाल्या होत्या त्यावेळी शहरात नगर परिषदेत जे पदाधिकारी निवडुन गेले होते तेच पदाधिकारी आपआपल्या प्रभागातील दैनंदीन कामे करण्याकडे आजची लक्ष देत आहेत. याच अणुषंगाने शहरातील पाणी पुरवठा व पाणी टंचाई बद्दल माध्यमांशी बोलतांना थेट जनतेतुन निवडुन आलेले माजी नगराध्यक्ष यांनी सांगितले कि, आमच्या कार्यकाळात जी १९ कोटी निधी खर्च करुन नविन पाणी पुरवठा योजना मंजुर करुन ५० टक्क्या पेक्षा जास्त कार्यान्वित केली आहे त्यामुळे शहरातील पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे. ऐकीकडे राज्यभर आणि विशेषतः मराठवाड्यात भीषण पाणी टंचाईने नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले असताना, किनवट शहर मात्र तुलनेत पाणीटंचाईपासून मुक्त असल्याचे चित्र दिसून येत आहे. याकरिता माजी



नगराध्यक्ष आनंद मच्छेवार व नगर परिषदेतील तत्कालीन पदाधिकाऱ्यांचे नियोजन आणि दूरदृष्टी कारणीभूत ठरत आहे.

यासोबतच, सध्याचे आमदार भीमराव केराम यांनीही पाणीपुरवठा प्रश्नावर लक्ष केंद्रित करत पैनगंगा नदीवर उच्च पातळी बंधारा मंजूर करून आणला आहे. या बंधाऱ्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून, त्याचे पूर्ण होणे हे किनवटच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या बंधाऱ्याच्या माध्यमातून शहरासाठी पाणी उचलून पुरवठा करण्याच्या नवीन योजनाही साकारल्या जाणार असल्याचे संकेत माजी नगराध्यक्ष मच्छेवार यांनी दिले आहेत.

बंधाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर या बंधा-याच्या साठवणीतुन किनवट शहरासाठी स्वतंत्र पाणी पुरवठा योजना पैनगंगा नदीवरुन सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून, आ. केराम यांच्या नेतृत्वाखाली हे काम शासनाकडून मंजूर करून घेण्याचा निर्धार आम्ही केला आहे, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

सध्याच्या आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी किनवट नगर परिषदेचे नियोजन, स्थानिक आमदारांचे प्रयत्न आणि शासनाकडून मिळालेला पाठबळ हे त्रिसूत्री उपाय यशस्वी ठरत असल्याचे या सर्व घडामोडींवरून स्पष्ट होते. योजना पूर्ण झाल्यास, किनवट शहर हे भविष्यात कायमस्वरूपी पाणीटंचाईमुक्त शहर ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## सिडकोत उंबरेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आज विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० एप्रिल-**

सिडको येथील वसंतराव नाईक महाविद्यालयासमोरील मैदानावर उंबरेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिना निमित्त २१ एप्रिल रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



येथील महिला मंडळाने या कार्यक्रमाचे आयोजन केले असून यामध्ये सकाळी ८.३० वाजता पिंटू महाराज यांच्या हस्ते अभिषेक होणार असून त्यानंतर भजनी महिला मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १ वाजतापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अलका कोटलवार, रेणुका यन्नावार, राणी दमकोंडवार ज्योती पोटपेलवार, प्रयाग घोरपडे, आरती कठाळे , कमल गवते, विजया मिराशे, ध्रुपदा वाघमारे, प्रियंका कवडे, राधिका माळवतकर, माधुरी चौधरी, रुपाली गुंडले, शांताबाई वाघमारे,शिवांगी जमदाडे, सुकेश गुंडले, ईश्वर माळवतकर आदींनी केले आहे.

## थकीत करावरील व्याजदर कमी करा : काँग्रेस

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२० एप्रिल-**

नगरपरिषदेने सर्वसामान्य नागरिकांच्या थकीत करावर २४ टक्के व्याज दर आकारले आहे. शासन स्थळावार व्याज माफिसाठी योजना राभावली असून व्याज माफ करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस ने आक्रमक भुमिका घेतली आहे. या विरोधात नगरपरिषदेस लेखी निवेदन देण्यात आले असून जन आंदोलन छेडण्याचा इशारा काँग्रसने दिला आहे.

यावेळी काँग्रेस कमेटी चे शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्षय राज बहादूर कोत्तावार, माजी उपनगर अध्यक्ष करीम खान साब, काँग्रेस जिल्हा सचिव गिरीश कोत्तावार, जिल्हा उपाध्यक्ष राजू चौदंते, कार्याआध्यक्ष मोहमद गौस, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्षय तोफीक पठाण,युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण यांच्या नेतृत्वाखाली शिष्ट मंडळाने निवेदन दिले.

# भाजपा नांदेड ग्रामीणच्या अध्यक्षपदी कुणाल चौधरी यांच्या नियुक्तीसाठी शेकडो कार्यकर्ते मुंबईला?

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२० एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा माजी जिल्हा उपाध्यक्ष कुणाल चौधरी यांना नांदेड जिल्हा ( उत्तर) अध्यक्षपद मिळावे म्हणून दोन तीनशे भाजपचे कार्यकर्ते मुंबईला जाऊन पक्ष श्रेष्ठीला व खा. अशोक चव्हाण आ. श्रीजया चव्हाण यांना निवेदन देणार असल्याची माहीती कार्यकर्त्यांनी दिली आहे.



ज्येष्ठ नेते विद्यानंदराव चौधरी हे भाजपाच्या खडतर काळात तालुकाअध्यक्ष पदावर होते. नांदेड जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक पदी सुद्धा त्यांनी काम केले आहे. मुदखेड नगर पालिकेचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. १९८५ ते २००१ पर्यंत सलग १७ वर्ष भाजपाचा झेंडा कायम ठेवण्यात यांची महत्त्वपूर्ण भुमिका राहिली आहे त्याचबरोबर त्यांचे चिरंजीव कुणाल चौधरी यांनी श्री गणेशोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून चौधरी कुटूंबाच्या वतीने गरजू रुग्णांसाठी मोफत आरोग्य तपासणी, नेत्र चिकित्सा, व मोतीबिंदू शिबिर, रक्तदान शिबिर आदि विविध शिबिरांचे आयोजन करून गरजूंना उबदार कपडे व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करण्याबरोबर त्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तसेच महीला दिनाचे औचित्य साधून नगरपालिका क्षेत्रातील नागरी भागात सफाई कामगार महिलांना साड्यांचे वाटप करून त्यांचा योग्य तो सन्मान करण्यात आला. ग्रामीण भागातील रुग्णांना औरंगाबाद, हैदराबाद, मुंबई, येथे यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यासाठी वेळोवेळी सातत्याने त्या रुग्णालयाकडे पाठपुरावा करून गरजू रुग्णांना अत्यावश्यक ती मदत मिळवून दिली.

मुदखेड शहरातील वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या रेल्वे भुयारी मार्गाची समस्या मार्गी लावून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालय व राज्य शासनाकडे लेखी निवेदने देऊन सातत्याने पाठपुरावा केला. सीमावर्ती ग्रामीण भागात महामंडळाच्या बसेस सोडण्यासाठी ही राज्य परिवहन महामंडळाकडे मागणी केली होती. मुदखेड येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ठिकाणी स्थानिक भरती प्रक्रिया राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली. त्यांनी कोरोना काळात मुदखेड शहर व ग्रामीण भागामध्ये गरजू व्यक्तींना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तू या साहित्यांचे वाटप भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने करून या सामाजिक कार्यासाठी निस्वार्थीपणे हातभार लावला. पक्षासाठी दिवस रात्र काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्याला नांदेड जिल्हा अध्यक्ष दिले तर योग्य न्याय मिळेल व पक्षाला बळकटी येईल त्यामुळे या निष्ठावान व हाडाच्या कार्यकर्त्याला न्याय मिळावा अशी भावना सर्वसामान्य ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची आहे.

# किनवट दक्षिणच्या भाजपा तालुका अध्यक्षपदी सूर्यकांत अरंडकर यांची निवड



**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि.२० एप्रिल-**

किनवट दक्षिणच्या तालुका अध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा माजी नियोजन समिती सदस्य सूर्यकांत आरडकर यांची इस्लापूर येथील विश्रामगृहामध्ये भाजपाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम, माजी राज्यमंत्री डी. बी. पाटील, भाजपा जिल्हा अध्यक्ष किशोर देशमुख, भाजपा संघटन प्रमुख संजय कौडगे, यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली किनवट विधानसभा दक्षिण तालुका अध्यक्ष निवडणूक प्रमुख अनिल वाघमारे , संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकशाही पद्धतीने दक्षिण भाजपा तालुका अध्यक्षपदी सूर्यकांत अरंडकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

याप्रसंगी भाजपा विधानसभा प्रमुख बाबुराव केंद्रे ओबीसीचे नेते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विधानसभा क्षेत्रातील पक्ष वाढीसाठी व पक्षाचे संघटन वाढीसाठी नव्यानेच नियुक्त झालेल्या अध्यक्षांनी गटा तटातील वाद बाजूला ठेवून पक्षाच्या सर्वच कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्ष वाढीचे काम जोमाने करावे असे मत व्यक्त केले. त्याचबरोबर आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष गोविंद अंकुरवाड यांनी पक्ष संघटन करत असताना कार्यकर्त्याला विश्वासात घ्यावे येत्या आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक डोळ्यासमोर ठेवून पक्षाला बळकटीकरण कशा पद्धतीने मिळवता येईल व पक्षाचा फायदा कशा पद्धतीने होईल याकडे नूतन अध्यक्षांनी लक्ष वेधावे अशा मार्मिक सूचनाही दिल्या.

या कार्यक्रमात प्रसंगी किनवट पंचायत समितीचे माजी उपसभापती कपिल करेवाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सूर्यनारायण पाटील, भाजपाचे नांदेड जिल्हा सचिव काशिनाथ शिंदे,अप्पाराव पेठचे माजी सरपंच भूमेश किनी, विवेक केंद्रे ,रवी चव्हाण, रमेश बोडेवाड, श्रीधर रेड्डी, गणेश पाटील, बाल गंगाराम भुशीवाड ,सागर पिसालीवार, शंकर मानकर, सतीश सोंडारे, हनुमंतू भुशीवाड संग्राम बिरकुले, कैलास जाधव, भाऊराव आडे, विठ्ठल नारदकर सत्यनारायण पोगूलवाड, प्रकाश दंडे, राजू आंबटवाड ,संदीप पाटील,विकास माहुरकर ,बालाजी पळसपुरे रवी कसबे , सूर्यकांत बोधनकर, प्रभाकर बैनवाड, सुरज लासीनकर, बंडू शिंदे, यांच्यासह परिसरातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपाने किनवट दक्षिण तालुका अध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्य सूर्यकांत आरडकर यांची निवड करून एक प्रकारे त्यांनी किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाच्या वेळी केलेल्या कार्याची पावतीची परतफेडच केली म्हणावी लागेल. व निष्ठावंताला न्याय दिला अशा प्रतिक्रिया सर्वसामान्यातून ऐकावयास मिळत आहेत .

**कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्ष बळकट करणार : सूर्यकांत आरडकर**

तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन व पक्ष हिताच्या बाबीचा विचार करून किनवट विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रत्येक खेड्यापाड्यात पोहोचवून कार्यकर्त्याची मत जाणून घेऊन कशा पद्धतीने पक्षाचे बळकटीकरण करता येईल. व पक्षातील कार्यकर्त्यांना कशा पद्धतीने न्याय देता येईल यासाठी सदैव प्रयत्नशील राहील. माझ्यावर किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी व भाजपाचे नेते डी.बी पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांनी मोठा विश्वास टाकून तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली यासाठी मी सार्थ ठरेल अशी ग्वाही नूतन तालुका अध्यक्ष सूर्यकांत अरंडकर यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भारतीय जनता पक्षाच्या तेरा मंडळ अध्यक्षांच्या निवडी जाहीर

## पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांची माहीती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**



भारतीय जनता पक्षाच्या जिल्ह्यातील १३ मंडळातील अध्यक्षांच्या निवडींची घोषणा जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी केली असून यावेळी अध्यक्षांना भाजपची ध्येय धोरणे आणि केंद्र व राज्य शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले. हिंगोली तालुकाध्यक्षपदी माणिकराव लोडे यांची फेरनिवड करण्यात आली असून शहराध्यक्षपदी रजनीश पुरोहीत यांची निवड करण्यात आली आहे.

येथील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात रविवारी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांच्या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. निवडणुकीसाठी आ. तान्हाजीराव मुटकुळे, प्रदेश उपाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी सभापती पांडुरंग पाटील, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर, सरचिटणीस उमेश नागरे, शिवदास बोड्डेवार, ॲड के के शिंदे, माजी शहराध्यक्ष मनोज शर्मा, माजी संचालक प्रशांत सोनी खोब्राजी नरवाडे, शंकर बोरूडे, सतीश सोमाणी, प्रभाकर भाकरे, उज्ज्वलाताई तांभाळे, अंकुश आहेर आदींनी निवडणुक पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

यावेळी बोलतांना शिंदे म्हणाले की, जिल्ह्याचा विस्तार पाहता यावेळी सहा नवीन मंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रातील सरकार आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकार समाजातील प्रत्येक घटकांसाठी विविध कल्याणकारी आणि महत्वाकांक्षी योजना राबवत आहेत. या योजनांचा लाभ सर्व जाती धर्माच्या लोकांना कोणताही भेदभाव न करता मिळत आहेत. त्यामुळे भाजपकडे लोकांचा कल वाढला आहे. जिल्ह्यात अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश घेत आहेत. सदस्य नोंदणी अभियानातही मोठा प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यातील तेरा मंडळातील अध्यक्षांच्या निवडीही त्यांचे काम पाहूनच करण्यात आल्या आहेत. तसेच यासाठी निवडणुक प्रमुखांची नियुक्तीही करण्यात आली होती. या मंडळ अध्यक्षांनी भाजपची ध्येय धोरणे घराघरापर्यंत रूजविण्याचे काम करावे असे आवाहन यावेळी शिंदे यांनी केले.

हिंगोली तालुकाध्यक्षपदी माणिक लोडे तर शहराध्यक्षपदी रजनीश पुरोहीत यांची निवड करण्यात आली. यावेळी दोन्हीही मंडळ अध्यक्षांचा सत्कार आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते करण्यात आला.

उर्वरित मंडळांमध्ये सेनगाव तालुकाध्यक्षपदी श्रीकांत कोटकर, गोरेगाव मंडळ अध्यक्षपदी डॉ रवींद्र पाटील, कळमनुरी शहराध्यक्षपदी ओंकार नावडे, कळमनुरी तालुकाध्यक्षपदी विठ्ठल भोयर, सिरसम मंडळ अध्यक्षपदी श्रीधर ठिगणे, आखाडा बाळापूर मंडळ अध्यक्षपदी डॉ सुधाकर लोमटे, औंढा नागनाथ तालुकाध्यक्षपदी सर्जेराव दिंडे, वसमत शहराध्यक्षपदी विष्णु बोचकरी, वसमत तालुकाध्यक्षपदी ज्ञानेश्वर मुंजाळ, जवळा बाजार मंडळ अध्यक्षपदी राजु पाटील आहेर यांची निवड करण्यात आली असल्याची माहीती शिंदे यांनी दिली.

# हिंगोली जिल्ह्यात चार ठिकाणी वाळू माफीयांवर कारवाई

## अधीक्षकांचे विशेष पथकासह इतर पथकांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

महसुल विभागापेक्षा पोलिस विभागच वाळू माफीयांवर कारवाई करीत असतांना दिसत आहे. जिल्ह्यात दोन दिवसांत स्थानिक गुन्हे शाखा, पोलिस अधीक्षकांचे विशेष पथक, तसेच वसमत ग्रामीण पोलिस यांनी या कारवाया करीत ९ ब्रास वाळू सह ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी रविवारी सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे आता वाळू माफीयांचे धाबे दणाणले आहे.

अवैध उत्खनन प्रकरणी महसुल विभागाची कार्यवाही होणे अपेक्षित आहे. प्रत्येक गावात तलाठी, मंडळ अधिकारी तसेच इतर महसुलचे अधिकारी यांची नियुक्ती आहे. त्यांना गावातील इत्यंभूत माहीती असूनही नदी काठच्या गावात अवैधपणे वाळूंचे साठे, वाळू उपसा होत असतांना मात्र पाहीजे तशी कार्यवाही होत नाही. शासनाने कडक धोरण अवलंबिले असूनही महसुलचे अधिकारी व कर्मचारी याकडे डोळेझाक करीत असतांना दिसत आहे. दुसरीकडे पोलिस विभाग मात्र वाळू माफीयांवर कारवाया करीत असतांना दिसत आहे. परंतु अजूनही मोठे मासे पोलिसांच्या गळाला लागत नसल्याचे दिसत आहे.

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यात पुर्णा नदीच्या पात्रातून रात्रीच्यावेळी वाळू उपसा करून त्याची वाहतुक केली जात होती. या संदर्भात मोठय प्रमाणावर तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आदेशावरून उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार शारदा दळवी, डॉ हरीष गाडे यांनी महसूल विभागाची पथकेही स्थापन केली. मात्र या पथकांना हुलकावणी देत वाळू वाहतुक केली जात होती.

दरम्यान, वाळू वाहतुक रोखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, यांनी स्वतंत्र पथके स्थापन केले. गुन्हे शाखेचे उपनिरीखक कपील आगलावे, जमादार पांडुरंग राठोड, विशेष पथकाचे उपनिरीक्षक चांदराव साखरे यांच्या पथकाने शनिवारी रात्रीच्या सुमारास पूर्णा नदीच्या पात्रात पाहणी केली. यामध्ये पूर्णा नदीच्या पात्रातील पोटा शेळके, नालेगाव, पेरजाबाद, शिवारात ट्रॅक्टरमध्ये वाळू भरून वाहतुक केली जात होती. पोलिसांना पाहताच चालकांनी ट्रॅक्टर जागेवर सोडून पळ काढला. पोलिसांनी तीन ब्रास वाळू व तीन ट्रॅक्टर व वाळू उपशासाठी वापरले जाणारे दोन यंत्र जप्त केले. याप्रकरणी सुधाकर वाघ, गोपीनथ दराडे यांच्यासह अन्य दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसमत ग्रामीण पोलिस ठाण्याचे सपोनि गजानन बोराटे, उपनिरीक्षक शेळके यांच्या पथकाने आसेगाव ते मरालापूर रोडवर वाळू वाहतुक करणार एक हायवा ताब्यात घेतला. असून त्यातील सहा ब्रास वाळू जप्त केली आहे. याप्रकरणी अमोल शेळके, दिलीप गच्चे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहरातील विविध भागात वाहतुकीच्या कोंडीमुळे नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**



मागील अनेक दिवसांपासून शहरातील विविध भागात वाहतुकीचे कोंडी होत आहे. रस्त्यावर उभे राहणारे हातगाडे, राजकीय नेत्यांचे चौकात लावण्यात येणारे मोठेमोठे बॅनर्स, पोस्टर्स यामुळे ही वाहतुक कोंडी होत असून याचा नाहक त्रास सर्वसामान्य नागरिकांनास सहन करावा लागत आहे.

शहरातील शासकीय विश्रामगृहाजवळील छत्रपती शिवाजी महाराज चौकात विविध राजकीय पक्षांचे नेत्यांचा दौरा असतो. याठिकाणी चौकात त्या त्या पक्षाचे राजकीय नेते आणि पदाधिकारी यांचे मोठेमोठे बॅनर्स आणि पोस्टर्स विना परवानगी रस्त्यावर लावीत असल्यामुळे या भागात वाहतुकीची वारंवार कोंडी होत आहे. भाजी मंडई, गांधी चौक, जवाहर रोड, इंदिरा चौक या भागात हातगाडेवाले रस्त्यावरच गाडे उभे करीत असल्यामुळे रस्ता अरूंद होत असून या रस्त्यावर नेहमीच सर्वसामान्य नागरिकांना वाहतुकीच्या कोंडीचा सामना करावा लागत आहे.

शहरातील नांदेड नाका, अग्रसेन चौक याठिकाणीही नेत्यांचे मोठेमोठे बॅनर्स आणि पोस्टर्स लावण्यात येत आहेत. त्यामुळे बसस्थानकातून येणाऱ्या बसेसला वाहने वळवितांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच येथे दोन शाळा आहेत. एखादे बॅनर वाऱ्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगावर पडल्यास मोठा अनर्थ होऊ शकतो. यावर संबंधित विभागांनी तत्काळ कार्यवाही करून शहरातील मुख्य चौकातील बॅनर्स, पोस्टर्स हटवून त्यांना कायम बंदी घालावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांमधुन होत आहे.



**हिंगोली– मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतर्गत शनिवारी हिंगोली रेल्वे स्थानकावरून ८०० ज्येष्ठ नागरिकांना आयोध्या येथे दर्शनासाठी विशेष रेल्वेला हिरवी झेंडी दाखवण्यात आली. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्टेशन मास्टर ब्रिजमोहन मीना, पप्पूकुमार, अलोक नारायण, रेल्वे पोलिस चंद्रकांत खंडारे, उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, समाधान घुटुकडे आदी. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### ॲड. सुनीता देशमुख यांचे निधन



हिंगोली– शहरातील शिवाजी नगर भागातील ॲड. सुनिता सतिषराव देशमुख टाकळीकर यांचे दिल्ली येथे अल्पशा आजाराने दि. १९ एप्रिल दुःखद निधन झाले. त्या जेष्ठ विधीज्ञ ॲड. सतीश आबासाहेब देशमुख टाकळीकर (बार कौन्सिल ऑफ इंडियाचे भूतपूर्व उपाध्यक्ष) यांच्या सुविद्य पत्नी होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर आज दि. २० एप्रिल रविवार रोजी सायंकाळी ७ वाजता अंतिम संस्कार होणार आहेत. अंतिम संस्कार ॲड सतीष आबासाहेब देशमुख यांचे शेत, डेंटल कॉलेजच्या जवळ, अकोला रोड, हिंगोली इथे अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच विधीज्ञ, व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने अंतयात्रेमध्ये सहभागी झाले होते.

### आज महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली– राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे एप्रिल, २०२५ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. २१ एप्रिल) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### १० हजारांचा गुटखा जप्त

हिंगोली– शहरातील जवळा-पळशी रोडवर एका दुचाकी चालकावर पथकाने छापा टाकला. त्याच्याकडून जाफरानी जर्दाच्या वीस पुड्या, केसरयुक्त विमलच्या २० पुड्या, विम पान बिग पॅक असलेल्या ११ पुड्या असा १० हजार रूपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी नितीन पवार याच्याविरूध्द शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गुटख्याची विक्री होत आहे. ही कार्यवाही म्हणजे डोंगर पोखरून उंदीर काढल्याप्रमाणे आहे.

# कयाधू नदीचे पात्रातील गाळ, झुडूपे काढण्याची नितांत गरज



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

शहरातील कयाधू नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर गाळ आणि झुडूपे वाढली आहेत. तसेच शहरातील घाण पाणी सोडण्यात येत असल्यामुळे पात्रात हिरवे पाणी दिसू लागले आहे.

शहरातून वाहणारी कयाधू नदी अत्यंत अस्वच्छ दिसत आहे. उन्हाळा असल्यामुळे नदीच्या पात्रात कमी प्रमाणात पाणी आहे. परंतु या पात्रात वाढलेली झुडूपे तसेच गाळ यामुळे पाणी नदीपात्रात जमा होणे अशक्य आहे. शहरातील घाण पाणीही या पात्रात सोडण्यात आल्यामुळे नदी अस्वच्छ दिसत आहे.

शासनाच्यावतीने या नदीपात्रातील गाळ काढण्याची ही योग्यवेळ असून नगर पालिकेच्या माध्यमातून यातील झुडूपे काढून पात्र स्वच्छ करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांमधून होत आहे. मागील वर्षी या नदीचे पात्र स्वच्छ करण्यामध्ये नगर पालिकेने पुढाकार घेतला होता. तसेच नदी काठावर साचलेल्या कचऱ्याचे ढीगही सध्या दिसत असून याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

# हिंगोली जिल्ह्यासाठी दोन दिवसांचा यलो अलर्ट, काळजी घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार हिंगोली जिल्ह्यासाठी आज शनिवार, व उद्या रविवारी १९ व २० एप्रिल दरम्यान दोन दिवस येलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. या नैसर्गिक आपत्तीसंदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणी जनतेने खबरदारी घ्यावी. खबरदारीची उपाययोजना म्हणून योग्य ती काळजी घ्यावी.

नागरिकांना तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या. अपस्मार, हदयरोग, मूत्रपिंड, यकृतविषयक आजारांमुळे ज्यांना शरीरात द्रवपदार्थ टिकवण्याचा प्रश्न येतो. त्यांनी डॉक्टरांच्या सल्लयानंतरच द्रवपदार्थ किंवा पाणी प्राशन करावे. ओआरएस म्हणजेच तोंडाने घ्यावयाचे शरीरातले पाणी वाढवणारे द्रवपदार्थ, घरगुती लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, ताक, नारळाचे पाणी घ्या. हलक्या रंगाचे वजनाला हलके आणी सौलसर सुती कपडे वापरा. घराबाहेर असाल तर डोके झाका. एखादे कापड वापरा, टोपी पाला किंवा छत्री वापरा. डोळ्यांच्या सुरक्षतेसाठी गॉगल वापरा आणि उन्हापासून कातडीचाही बचाव करायला सनस्क्रीम वापरा. अतिउष्णतेमुळे ज्यांना सर्वाधिक हानी पोहोचेल असे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी किंवा स्थूल व्यक्तींची विशेष काळली घ्यावी.

नागरिकांनी उन्हात जायचे टाळा, विशेषतः दुपारी १२ ते ०३ मध्ये दुपारी बाहेर असताना श्रमाची कामे टाळा. अनवाणी बाहेर जाऊ नका. अतिउष्णतेमुळे ज्यांना सर्वाधिक स्वयंपाक करणे टाळा. दारं खिडक्या उघड्या ठेऊन अन्न शिजवण्याचे क्षेत्र स्वयंपाकघर हवेशीर राहील बघा. अल्कोहोल म्हणजे दारु, चहा, कॉफी, शीतपेय टाळा त्यातून शरीरात पाणी कमी होते. उच्च प्रधिनयुक्त मिठाचे प्रमाण जास्त असलेले किंवा तिखट तसेच तेलकट अन्न खाऊ नका. शिळे अन्न खाऊ नका. चारचाकी वाहन लावून ठेवताना त्यात लहान मुले किंवा प्राणी ठेऊ नका. चमकणारे दिवे किंवा बल्ब वापरू नका, त्यातुन अनावश्यक उष्णता निर्माण होते, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

# शिक्षक संघटनेची वसमत तालुका कार्यकारणीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**



महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना जिल्हा हिंगोली यांच्यावतीने केंब्रिज महाविद्यालय वसमत येथे वसमत तालुका नूतन पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची ध्येयधोरणे आणि पुढील वाटचाल, संघटनेचे कार्य आणि यावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. आशिष इंगळे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. इंगळे यांनी हिंगोली जिल्ह्यात शिक्षक संघटना बळकटी कारणासाठी प्रत्येक शिक्षक बांधवानी योगदान द्यावे. आतापर्यंत आपण संघर्ष करूनच अनुदानचा लढा जिंकला आणि येथून पुढे पन संघर्ष करूनच संघटनेच्या माध्यमातून पूर्ण न्याय मिळवू असे प्रतिपादन केले.

पुढे उपाध्यक्ष प्रा. सुनील डुकरे यांनी संघटना प्रति सर्वानी एकजूट होऊन आपला लढा जिंकायचा असे सांगितले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य परमेश्वर जगताप, औंढा तालुका प्रा. विष्णू उबाळे, हिंगोली तालुका अध्यक्ष प्रा. प्रशांत चाटसे, उपप्रचार्य प्रा. भगवान वानखेडे, प्रा.हिरवे एम. जी. प्रा.येवले व्ही. ए प्रा. कोरडे टी. एन. प्रा. कमळू एल. डी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संघटनेचे हिंगोली जिल्हा कार्याध्यक्ष म्हूणन प्रा. गोविंद कर्वे यांची निवड करण्यात आली. यावेळी वसमत तालुका नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली यामध्ये प्रा. धर्मेंद्र होरांडे यांची वसमत तालुका अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तर प्रा. प्रकाश साळवे यांनी वसमत तालुका उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तर सचिव म्हणून प्रा. सोमनाथ राऊत तर सहसचिव म्हणून प्रा. शेवाळकर शिवराज यांची निवड करण्यात आली. तालुका प्रसिद्धी प्रमुख म्हणून प्रा. आत्माराम राजगोरे तर तालुका महिला अध्यक्ष प्रा.कांचन कोल्हे यांची निवड करण्यात आली.

या सर्व पदाधिकारी यांना संघटनेचे हिंगोली जिल्हाध्यक्ष प्रा. आशिष इंगळे, उपाध्यक्ष प्रा. सुनील डुकरे औंढा तालुका अध्यक्ष प्रा. विष्णू उबाळे, हिंगोली तालुका अध्यक्ष प्रा. प्रशांत चाटसे यांच्या हस्ते निवडपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गोविंद कर्वे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.आत्माराम राजगोरे तर आभार प्रा. मोहिते टी. बी यांनी मानले. यावेळी वसमत तालुक्यातील शिक्षक, बांधव, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उन्हाचा पारा ४२ अंशावर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

शहरासह जिल्ह्यात उन्हाचा पारा वाढतच असून मागील आठवण्यात ३८ ते ४० अंशापर्यंत तापमान पोहोचले होते. मात्र दोन दिवसांपासून उन्हाचा पारा ४२ अंशावर पोहोचल्यामुळे हिंगोलीकरांना उन्हाचे चटके बसून लागले आहेत. दुपारी शासकीय कार्यालये, रस्ते तसेच बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पहायला मिळत असून नागरिक गर्मीमुळे हैराण झाले आहे. उन्हापासून बचावासाठी नागरिक टोप्या, रूमाल तसेच हेलमेट, छत्री यांचा वापर करतांना दिसत आहेत. थंड पेयाच्या दुकानातही नागरिकांची गर्दी वाढत असतांना दिसत आहे.